**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**
**मा.स्थायी समिती सभेची नोटीस (ऑनलाईन झुम ॲप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २२/०७/२०२१

प्रति,
मा. ------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०५ सोमवार दिनांक २६/०७/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे. सही /-

प्र.नगरसचिव

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक - २६/०७/२०२१ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ५० | मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे |
| ५१ | अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५३ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ५४ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुंक भुलतज्ञ डॉक्टरांची तीन वर्षा करीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर वाढीव मानधनानुसार अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात टेक्नीकल या पदावर थेट पध्दतीने मुलाखती नुसार पात्र ठरवून निवड झ ालेल्या उमेदवारांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ५६ | अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.मुळे प्रमोद, वीजतंत्री श्री.फडके मधुसुदन,गाळणी निरिक्षक,श्री.सोनवणे कैलास,वाहनचालक या सेवानिवृत्त कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ५७ | अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.बाळू लक्ष्मण शिंदे वॉलमन / मदतनीस यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ५८ | अर्जदार संतोष हस्तीमल गुगळे, रा.चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.९ बील क्र. ७०५ या मालमत्ता कराची आकारणी दुरूस्ती शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५९ | अर्जदार श्री.राजेंद्र गंगाधर राउत,कुंभार गल्ली ,तोफखाना,.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बील क्र. १०४९ नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची केलेली आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६० | अर्जदार श्री.बसवराज काशप्पा पारशेट्टी रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३७ व १०३८ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८ वरील घरपट्टीची आकरणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६१ | अर्जदार सौ.वैशली दिलीप मेहेर रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३६ व १०३८/१ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८/१वरील घरपट्टीची आकरणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६२ | अहमदनगर महानगरपालिका कोविड सेंटर करीता ऑक्सीजन Concentrator Single Ourlet ७ Liters /Min Capacity With Stndard Accessories - १०० Nos.GeM पोर्टलवर खरेदी प्रक्रिया करून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ६३ | अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितेतर सुधार योजना सन-२०२०-२०२१ अंतर्गत प्रभाग क्र.६ मधील वैदुवाडी चौक,शुभ मंगल कार्यालय पर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत ई-निविदा क्र. ६७६४८२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ६४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर ( प्रभाग क्रमांक १ ते८ )मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| ६५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर ( प्रभाग क्रमांक ९ ते १७ )मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| ६६ | अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

**टिप** :- १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.

२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.

३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि. २८ जून २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम ॲप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- ५० - मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभांचे इतिवृत्ताची प्रत

**२]** विषय क्रमांक- ५१ ते ६६ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५०** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभेच कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. ३ सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ३ शुक्रवार दि.०९/१०/२०२० रोजी रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५१** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ-** बांधकाम विभाग यांचेकडील जा.क्र.१५५ दि.११/०५/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.१५५ दि.११/०५/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये बांधकाम विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१६/१२/२०२० ते १५/०६/२०२१ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि.१६/०६/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने बांधकाम विभागामध्ये कामकाजाचे स्वरूप पहाता आवश्यकता असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.०९/०२/२०२१ च्या पुर्व मंजुरी पारित ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक १०२६ दि.०८/४/२०२१ अन्वये बांधकाम विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंत (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांची रूपये २५,०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन दि.१६/१२/२०२० पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मा.स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहुन करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दि.१६/०६/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार बांधकाम विभागासाठी करारानुसार खालील तक्त्या दर्शविलेल्या संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक १९/०६/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहूल शंकर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २५,०००/- | बांधकाम विभाग |

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्राय घ्यावेत.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित कनिष्ठ अभियंता सिव्हील यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- कनिष्ठ अभियंता श्री राहुल पडोळे यांनी मानधन वाढी बाबत त्यांनी अर्ज केला आहे.त्यांचे मानधन वाढविणे करीता प्रशासनाने पुढील सभेमध्ये प्रस्ताव सादर करावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.पुढील सभेमध्ये मानधन वाढीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री.पडोळे राहुल शंकर यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री.पडोळे राहुल शंकर यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन दिनांक १९/०६/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. त्यांचे मानधन वाढविणे करीता प्रशासनाने पुढील सभेमध्ये प्रस्ताव सादर करावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५२** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.९० दि.२१/०५/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा.क्र.बा.दे.दवा.९० दि.२१/०५/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १) मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) २) स्वप्नाली प्रताप इंगावले यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२५/११/२०२० ते २४/०५/२०२१ अखेर असून सदरची मुदत हि दिनांक २८/०५/२०२१ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवून दि.२८/०५/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत" सुचित केलेले आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दिनांक ०८/०४/२०२१ अन्वयेच्या पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था कालबध्द नेमणुक १२७७ दि.०६/०५/२०२१ अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.१०,४००/-व २) स्वप्नाली प्रताप इंगावले यांची रू.१३०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.२५/११/२०२० पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरची मुदत ही दिनांक २५/०५/२०२१ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कलम ५३ च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १) मोहिनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.१०,४००/-व २) स्वप्नाली प्रताप इंगावले यांची रू.१३०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२८/०५/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित कनिष्ठ अभियंता सिव्हील यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

डॉ.मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२८/०५/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५३** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- रक्तपेढी विभाग यांचेकडील जा.क्र.११० दि.२५/०५/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावा सादर करण्यात येतो की,रक्तपेढी विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.११० दि.२५/०५/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील नियुक्तीचा कालावधी दि.०२/०१/२०२१ ते ०१/०७/२०२१ अखेर सहा महिन्याकरिता असून सदरची मुदत ही दिनांक ०२/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त होत असल्याने संबंधितांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील नियुक्तीबाबत " नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक ०८/०४/२०२१ अन्वये पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषांगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक १२७५ दि.०६/०५/२०२१ अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशीयन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची रू.१६०००/-या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दि.०२/०१/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.०२/०७/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ०५/०७/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मोरे पल्लवी दगडू | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७ /०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुत्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी " असे नमुद केले आहे.प्रस्तावित कनिष्ठ अभियंता सिव्हील यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- लॅब टेक्नीशियन मोरे मॅडम या रक्तपेढी विभागामध्ये जवळपास ११ वर्षापासुन काम करीता आहेत.परंतु त्यांच्या मानधनामध्ये कुठल्याही प्रकारे वाढ करण्यात आलेली नाही.ऑफिस रिपोर्ट नुसार त्यांना सहामहिन्याची मुदतवाढ देण्यास हरकत नाही परंतु त्यांना मानधन वाढ दिली तर बरे राहिल.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सुध्दा नियमानुसार मानधन वाढ देणे योग्य आहे असे दिले आहे.त्यांनी आपल्याकडे फेब्रुवारी मध्ये पत्र दिले होते की,सन २०१० पासुन त्या जॅईन झाल्या आहेत.त्यांचे काम चांगले आहे.जर त्यांना मानधन वाढ केली तर त्यांना न्यय मिळेल.

मा.सभापती साहेब :- त्यांचे पत्र आलेले आहे.सन २०१० पासुन त्यांच्या मानधनामध्ये वाढ झालेली नाही.रू.९०००/- हजार वाढ होण्याबाबत पत्र दिले आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- जरी त्यांनी रू.९०००/- वाढ बाबत पत्र दिले तरी त्यांना थोडयाप्रमाणात वाढ करण्यात यावी अशी माझी विनंती आहे सभापती साहेब.

मा.श्री.मनोज कोतकर :- त्यांना मानधन वाढ दिली तर बरे होईल.कोरोना काळामध्ये आपण सर्व धावपळ करीत होतो.ज्या नर्स,डॉक्टर यांनी प्रमाणीकपणे त्यांनी काम केले आहे.आपण यांना मानधव वाढ करावी.

मा.सभापती साहेब :- इतक्या वर्षापासुन ते सेवा देत आहेत,त्यांच्या मानधनामध्ये वाढ झाली पाहिजे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- आपल्याला काहीतरी एक धोरण आखून घ्यावे लागेल.त्यामध्ये ठरवावे लागेल.२५ टक्के वाढ वगैरे.आम्ही एक धोरण तयार करतो.आपल्याकडे आणतो त्यांनुसार आपण सर्वाना मानधन वाढ देवू.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच मानधन वाढीबाबतचे धोरण ठरवायला वेळ लागणार असल्याने सध्या त्यांच्या मानधनामध्ये २५ % वाढ करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मानधनामध्ये वाढ करणे योग्य राहिल.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांना दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ०५/०७/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार त्यांना सध्या देण्यात येणा-या मानधनामध्ये २५% वाढ करण्यास ही सभा मान्यता देता आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांना दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ०५/०७/२०२१ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार त्यांना सध्या देण्यात येणा-या मानधनामध्ये २५% वाढ करण्यास ही सभा मान्यता देता आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५४** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुंक भुलतज्ञ डॉक्टरांची तीन वर्षा करीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर वाढीव मानधनानुसार अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह
संदर्भ- १. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना जा.क्र.२२५ दि.२५/०६/२०१९ ने पॅनल नेमणूक
२. मा.स्थायी समिती सभा क्र.०२ ठराव क्रमांक २७ दि.०३/०६/२०१९ अन्वये कै.बा.दे.दवाखाना येथील भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलला मानधन वाढ.

विनंती रिपोर्ट की,कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता बधिरिकरण तज्ञांची (भुलतज्ञ) आवश्यकता असेते.त्यासाठी कै.बा.दे.दवाखाना येथे शहरातील अनुभवी डॉक्टरांचा प्रती केस मानधनावर पॅनलमध्ये वेळोवेळी नेमणूक करण्यात येते.त्याकरीता जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना २२५ दि.२५/०६/२०२१ अन्वये दि.२५/०६/२०१९ ते ०९/०७/२०२१ अखेर भुलतज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती.सदर पॅनलची मुदत ही दिनांक ०९/०७/२०२१ रोजी समाप्त होणार आहे.दवाखान्यामध्ये भुलतज्ञ डॉक्टरांना सध्या १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.८००/- ३.सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.१५००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.१७००/- प्रति केस (Night १० .०० Pm to ६.००am) या प्रमाणे मानधन अदा करण्यात येत आहे.हॉस्पिटलमधील प्रसुती रूग्णांच्या आवश्यक उपचाराच्या दृष्टीने पुढील कालावधीकरिता भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणे गरजेचे आहे.

तसेच सध्याच्या मानधनावरील भुलतज्ञ डॉक्टरांनी प्रत्येकी केस मानधनवाढ करणे बाबत विनंती अर्ज दिलेला होता.त्या अनुशंगाने मानधन वाढी बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभा क्र.०२ ठराव क्रमांक २७ दिनांक ०३/०६/२०२१ अन्वये पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

ऑफिस रिपोर्ट नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता आत्यावश्यक सेवेसाठी पॅनल शिपवरील भुलतज्ञ डॉक्टरांच्या प्रति केस मानधन १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.१०००/- ३.सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.२०००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.२२५०/- प्रति केस (Night ११ .०० Pm to ७.००am) तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/-प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/-प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस मानधन देणेबाबतच्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलवरील डॉक्टरांच्या मानधन वाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.प्रस्तावित दर हे किमान दोन वर्षाकरिता लागू राहतील.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

पुढील कालावाधीकरिता पॅनल नेमणूक करणेकामी भुलतज्ञ डॉक्टरांच्या संघटनेला पत्र देवून इच्छुक भुलतज्ञ डॉक्टरांचे अर्ज या कार्यालयाकडे मागविण्यात आलेले आहेत.त्या अनुशंगाने १)डॉ.स्नेहलता नितीन सायंबर २)डॉ.सचिनकुमार दशरथ लांडगे ३)डॉ.प्रियंका रूपनवर (लांडगे) ४)डॉ.कृष्णा ग्यानदेव आनारसे

५) डॉ.महादेव रंदाळे ६) डॉ.शशांक प्रभाकर मोहळे या भुलतज्ञ डॉक्टरांचे अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत.

तरी या कार्यालयाकडे प्राप्त अर्जाप्रमाणे वरील भुलतज्ञांची मा.स्थायी समिती सभा क्र.२ ठराव क्रमांक २७ दिनांक ०३/०६/२०२१ अन्वये वाढ केलेल्या मानधनानुसार १.मायनर ऑपरेशन जनरल ॲनेस्थेशिया (G.A.) करिता रू.६००/- प्रति केस २. मायनर ऑपरेशन स्पायनल ॲनेस्थेशिया (S.A.) करिता रू.१०००/- ३.सिझेरीयन शस्त्रक्रिया करिता रू.२०००/- प्रति केस ४. नाईट सिझेरीयन व हायरीस्क करिता रू.२२५०/- प्रति केस (Night ११ .०० Pm to ७.००am) तसेच एखाद्या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेस एका वेळी दोन भुलतज्ञ डॉक्टरांची आवश्यता भासल्यास त्याकरिता दिवसा भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/-प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२०००/-प्रति केस मानधन व रात्रपाळीस भुल देणेकरिता प्रत्येक भुलतज्ञास रू.२२५०/- प्रति केस या प्रमाणे दिनांक आदेश निर्गमीत दिनांकापासुन तीन वर्षाच्या कालावधीकरिता पॅनलशिपवर नेमणूक करणेकामी तसेच पॅनल नियुक्त डॉक्टरांचा पॅनलमध्ये समावेश करणे व ज्या भुलतज्ञ डॉक्टरांना काम करण्याची इच्छा नसल्यास पॅनलमधून वगळणे इत्यादी बाबतीत प्रशासकीय कार्यवाही या कार्यालयामार्फत करणेत येईल.सबब सदरचा पॅनलनेमणूकी बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव ठेवणेस सविनय सादर.तसेच पुढील कालावधीकरिता पॅनलची नेमणूक होई पर्यत दवाखान्याची तातडीची सेवेचा विचार करता संदर्भ क्रमांक १ ने नेमण्या आलेल्या भुलतज्ञ डॉक्टरांच्या पॅनलला सध्याच्या मानधनावर मुदत वाढ देणेस प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.स्थायी समिती पुढे भुलतज्ञ पॅनल नियुक्ती करणेकामी विषय घेणेस शिफारस आहे.

सोबत - भुलतज्ञ डॉक्टरांचे अर्ज व शैक्षणीक प्रमाणपत्र

येणे प्रमाणे प्र.वैद्यकीय अधिक्षक कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुंक भुलतज्ञ डॉक्टरांची तीन वर्षा करीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर वाढीव मानधनानुसार अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.डॉ.राजुरकर सर माहिती सांगा.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :- बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे भुलतज्ञ पगारी बेसेसवर कोणी नाही.आपल्याकडे आपण चार्जेस देतो.मागील स्थायी समितीच्या सभेमध्ये त्यांचे मानधन आपण वाढवून घेतले आहे.त्यांची मुदत तीन वर्षाची असते ती मुदत संपली होती.त्यामुळे त्यांचा पॅनल नेमणूकीचा प्रस्ताव ठेवला आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- मानधनावरील तेच कर्मचारी आहेत.गेल्या दहा ते पंधरा वर्षापासुन काम करीत आहेत.त्यांची मागणी आहे की,मानधन वाढवून दया.याकरीता काहीतरी धारण ठरवावे लागेल आपल्याला.१० वर्ष झाल्यानंतर २५ टक्के वाढ.पाच वर्ष झाल्यानंतर १० टक्के वाढ.असे काही धोरण ठरवून आपल्याकडे देवू.मग या सर्वाची मानधामध्ये वाढ करू.

मा.सभापती साहेब :- इतक्या वर्षापासुन ते सेवा देत आहेत,त्यांच्या मानधनामध्ये वाढ झाली पाहिजे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- आपल्याला काहीतरी एक धोरण आखून घ्यावे लागेल.त्यामध्ये ठरवावे लागेल.२५ टक्के वाढ वगैरे.आम्ही एक धोरण तयार करतो.आपल्याकडे आणतो त्यांनुसार आपण सर्वाना मानधन वाढ देवू.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुंक भुलतज्ञ डॉक्टरांची तीन वर्षा करीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर वाढीव मानधनानुसार अटी व शर्तो प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात इच्छुंक भुलतज्ञ डॉक्टरांची तीन वर्षा करीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर वाढीव मानधनानुसार अटी व शर्तो प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.
सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५५** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात टेक्नीकल या पदावर थेट पध्दतीने मुलाखती नुसार पात्र ठरवून निवड झालेल्या उमेदवारांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त साहेब यांचे दि.३/५/२०२१ रोजीचे मान्यतेने

२. मा.आयुक्त साहेब यांचे दि. ५/७/२०२१ रोजीच मान्यतेने

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे. दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवा असल्याने सदरील ठिकाणी महानगरपालिकेतील आस्थापना सुचीवरील कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने रक्तपेढी विभागातील तांत्रिक पदे रिक्त झाले. त्यामुळे रक्तपेढी विभागाचे कामकाज हे पुर्ण क्षमतेने होत नसल्याने आणि मा. शासनाचे अन्न व प्रशासन विभागाचे नियमानुसार असल्याने सदरचे रिक्त पदे त्वरीत भरणे आवश्यक असुन तसेच नागरिकांना आरोग्य सेवा देण्याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने मा.महापौर साहेब, स्थायी समिती सभापती साहेब व मा.आयुक्त साहेब , मा.उपायुक्त (कर) यांचे समवेत दि.३०/०३/२०२१ रोजी बैठकीमध्ये तोंडी सुचना दिल्या की, रक्तपेढी विभाग चालू करून घेण्यास सांगितले. तसेच रक्तपेढीतील रिक्त असलेल्या तांत्रिक कर्मचारी भरणेबाबत चर्चा झाली. त्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांचे मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देउन दि.१६/४/२०२१ रोजी मुलाखती आयेजित करण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मा.आयुक्त, मा.उपायुक्त (कर), मा.उपायुक्त (सा.) व रक्तपेढी विभाग प्रमुख यांचे उपस्थित उमेवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेण्यात येवुन खालील प्रमाणे पदानुसार उमेदवारांची निवड करण्यात येवुन प्रतिक्षा यादी नोटीस बोर्डवर लावण्यात आली.

| अ.क्र. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | पद संख्या | निवड झालेले उमेवारांचे नाव | प्रतिक्षा सुची उमेदवारांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | टेक्नीकल सुपरवायझर (रक्तपेढी साठी ) | ०२ | १. श्री. विश्वनाथ सर्जेराव पतंगे | -- |
| | | | २. श्री. देविदास किशोर परभणे | -- |
| २ | लॅब टेक्नीशियन (रक्तपेढी साठी ) | ०२ | १.सौ. सुनिता संपत पवार | -- |
| | | | २. सौ. सुवर्णा राजेश घोरपडे | -- |
| ३ | लॅब टेक्नीशियन (कोव्हीड-१९ साठी ) | ०५ | १. सौ. स्वाती दशरथ विधाते | -- |
| | | | २. हसन बिन तालेब बासाद | -- |
| | | | ३. श्री. योगीराज लक्ष्मण आर्वेल | -- |
| | | | ४. सौ. राणी बबन गुंजाळ | -- |
| | | | ५. सौ. दिपाली महेश वाळके | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | स्टाफ नर्स (रक्तपेढी साठी) | ०४ | १. सौ. भाग्यश्री रविंद्र जमदडे | |
| | | | २. सौ. स्नेहल अशोक गायकवाड | |
| | | | ३. सौ. छाया प्रविण पातारे | |
| | | | ४. सौ. मनिषा दशरथ विधाते | |
| ५ | स्टाफ नर्स (कोव्हीड-१९ साठी ) | ०२ | १. सौ. सोनाली भाउसाहेब पवार | |
| | | | २. सौ. प्रियंका भाउपाटील पालवे | |
| ६ | सामाजिक कायकर्ता (PRO) (रक्तपेढी साठी ) | ०१ | १. श्री. संतोष भाउसाहेब काळे | |

त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेब यांनी सदर पदांना दि. ३/५/२०२१ रोजी मंजुरीप्रमाणे खालील तक्त्यातील निवड झालेल्या उमेदवार ६ महिने मानधनावर तत्वावर करारनाम्यानुसार अटी व शर्तीस अधिन राहुन नियुक्ती करण्यात आलेले आहे. असुन त्यांना रक्तपेढी विभाग जा.क्र. १०० दि.४/५/२०२१ रोजी अ.क्र. २ ते ७ यांना नियुक्ती आदेश करारबध्दसाठी अटी व शर्तीनुसार देण्यात आले. तसेच अ.क्र.१ यांना वैद्यकीय अधिकारी यापदी रक्तपेढी जा.क्र. १०७ दि.१८/५/२०२१ रोजीचे हे निवड झालेल्या उमेदवारांपैकी खालील तक्त्यात नमुद केलेले उमेदवार रक्तपेढीमध्ये हजर झाले आहे.

तसेच वरील अ.क्र.१ मधील टेक्नीकल सुपरवायझर २ पैकी १ हजर झालेले असुन २ नंबरचे श्री. देविदास किशोर परभणे हे हजन न झाल्याने सदरचे रिक्त पदी अ.क्र.७ मधील संदर्भिय २ नुसार खालील तक्त्यात नमुद केलेले कर्मचारी यांना रक्तपेढी जा.क्र.        दि.०९/०७/२०२१ रोजी यापदी आदेशान्वये रक्तपेढीमध्ये हजर झाले आहे.

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.श्री.सोमनाथ जयराम नंदकर | वैद्यकीय अधिकारी | ७५,०००/- | रक्तपेढी विभाग दि. १८/०५/२०२१ |
| २ | श्री.विश्वास सर्जेराव पतंगे | टेक्नीकल सुपरवायझार | १७,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०६/०५/२०२१ |
| ३ | सौ.सुनिता संपत पवार | लॅब टेक्निशियन | १७,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०४/०५/२०२१ |
| ४ | सौ.राणी बबन गुंजाळ | लॅब टेक्निशियन | १७,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०६/०५/२०२१ |
| ५ | सौ.स्नेहल अशाक गायकवाड | स्टाफ नर्स | २०,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०४/०५/२०२१ |
| ६ | सौ.योगिता सुहास गायकवाड | स्टाफ नर्स | २०,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०४/०५/२०२१ |
| ७ | श्री.संतोष भाउसाहेब काळे | जन संपर्क अधिकारी | १६,०००/- | रक्तपेढी विभाग दि. ०४/०५/२०२१ |
| ८ | हसन बिन तालेब बासाद | टेक्नीकल सुपरवाझर | १७,०००/- | रक्तपेढी विभाग दि. / / २०२१ |

वरील निवड यादी पैकी नियुक्ती केलेले कर्मचारी रूजु न झाल्यास अथवा काही कारणास्तव नियुक्ती न स्विकारल्यास प्रतिक्षासुची वरील निवड संबंधितांची देखील नियुक्ती करणे संयुक्तीक होईल.

वरील नागरीकांच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक सेवा असल्याने मा.अन्न व औषध प्रशासन यांचे निर्देश असल्याने वरील प्रमाणे रिक्त पदी करारबध्द पध्दतीने अटी व शर्तीनुसार मानधनावर कर्मचारी यांच्या नियुक्त्या करणे आवश्यक होते.तरी मुंबई महाराष्ट्र प्रांतिक अधि.१९४९मधील कलम ५३च्या अनुषंगाने सदरचे करण्यात आलेल्या नियुक्तीस कार्योत्तर व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीचे मान्यता घेणे उचित वाटते.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी ,रक्तपेढी विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी समिती मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात टेक्नीकल या पदावर थेट पध्दतीने मुलाखती नुसार पात्र ठरवून निवड झालेल्या उमेदवारांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मा.सभापती साहेब,आपण रक्तपेढी मध्ये जावून तेथील काय परिस्थीती आहे ती पाहुण रक्तपेढी कशी सुरू होईल या दृष्टीने प्रयत्न केले आहेत.आम्ही आरोग्य समिती मार्फत तेथे गेलो होते.परंतु प्लाझ्मा,प्लेटलेट हे घटक तेथे अदयाप कार्यान्वीत झालेले नाही.त्या करोडो रूपयांच्या मशिन पडून आहेत.याबाबत डॉ.शेंडगे यांनी त्याठिकाणी काय अडचणी आहेत.किती रक्तबॅग होतात.किती रक्तसंकलन शिबीर होतात या बाबतची माहिती दयावी.बाहेर दिड ते दोन हजार रूपयांना रक्त पिशवी मिळते.आपली सर्वाची इच्छा आहे की,सर्वसामान्य नागरीकांना अल्पदरामध्ये रक्त पिशवी मिळावी.प्लेटलेट ,रक्तघटक उपलब्ध होईल याबद्दल माहिती दयावी.डॉ.शेडाळे ऑनलाईन येई पर्यत मा.उपायुक्त डांगे यांना प्रश्न विचारायचे आहेत.

मा.सभापती साहेब :- विचारा

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १४९ यामध्ये प्रत्येक सफाई कामगार आहे.त्याला आवारा ठरवून दिलेला आहे.तो किती क्षेत्रफळामध्ये साफसफाई करू शकतो.याबाबत मला माहिती सांगा.नियम काय आहे.सफाई कामगाराला किती क्षेत्र दिले आहे.तो किती काम करू शकतो.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- सफाई कामगाराने कमीत कमी ५०० मीटर सफाई केली पाहिजे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आमचा वॉर्ड नागापुर ब्रीज पासुन सुरू होतो.तपोवन रोड,निलगीरी पार्क,एकविरा चौक,यशोदानगर ते नगरमनमाड हायवे ते पद्मावती चौक सर्व क्षेत्रफळ पाहिले तर नउ ते दहा किलोमीटर आहे.या ठिकाणी १०० कामगार दिले तरी कमी पडतील.प्रभागाती आहेत ते कामगारांना दिलेल्या एरीया मधील एक कामगार डॉ.शेडाळे यांनी काढून त्याची बदली करून टाकली.एक केअरटेकरची बदली केली.तुमच्या ५००मीटरच्या धोरणानुसार २० ते २५ टक्के कामगार आमच्या भागामध्ये आहेत.काही कॉलनी मध्ये १० ते १५ दिवस झाडायला जात नाही.आमच्या भागामध्ये कामगार वाढवायचे सोडून अशापध्दीतीने आमच्या भागातील कामगार काढत असात तर आम्हाला नागरीकांना घेवून कार्यालयात बसावे लागेल.सध्या कोरोनाचा काळ चालू आहे.स्वच्छता होत नाही.जे कामगार

आहेत त्यांच्याकडून आम्ही काम करून घेतो.त्याचे तुम्हाला गांभीर्य नसेल तर प्रभागातील नागरीकांना घेवून यावे लागेल.आपण समक्ष येवून पहाणी करावी.काय परिस्थिती आहे ती पहावी.

मा.सभापती साहेब :- डॉ.शेडाळे माहिती दया.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- तो कर्मचारी होता त्याचे वडील संतोष ग्यानाप्पा यांच्या वॉर्ड मध्ये काम करीता होते.असे मला त्यांनी सांगीतले.हा कर्मचारी आपण वारसाने घेतला आहे.त्याचे म्हणणे आहे की,या कामगाराचे वडील सेवानिवृत्त झाल्याने माझ्या कडे कोकणताही कामगार नाही.त्यांनी मागणी केली होती.त्यांचे मला सतत फोन येत होते.त्यामुळे डॉ.शेडाळेंना सांगीतले होते,त्यांना तिकडे दया.तुमच्या कडे दुसरा कामगार दया.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- कामगारांना एरीया माहित असतो.क्षेत्रफळाच्या दृष्टीने आमचा प्रभाग सर्वात मोठा आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- आपण मिटींग संपल्यानंतर चर्चा करून तुमचा प्रश्न सोडवू.

मा.श्री.शाम नळकांडे :- आमच्या कडील ३ ते ४ कर्मचारी त्यांनी रक्तपेढी मध्ये ठेवले आहेत.आमच्या प्रभागामध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो.मी डॉ.शेडाळेंना सांगीतले आहेत.जे कर्मचारी ज्या भागातुन गेले त्या भागामध्ये देण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे व मा.श्री.शाम नळकांडे यांच्या प्रश्नांबाबत आपण चर्चा करून मार्ग काढावा.

मा.श्री.शाम नळकांडे :-मुलाखती व्दारे नियुक्त करण्यात आलेल्या डॉक्टरांची नियुक्ती केव्हा झाली.त्याची दिनांक सांगा,आत्तापर्यत त्यांनी किती रक्तसंकलनाचे शिबीर घेतले आहेत.या बाबत थोडक्यात माहिती दयावी.

मा.सभापती साहेब :- त्यांनी किती रक्तसंकलनाचे शिबीरे घेतली.त्यामध्ये किती रक्तबॅगेचे संकलन केले याची सुध्दा माहिती दयावी.त्यांना घेतल्यानंतर त्यांचा काय उपयोग झाला.याची संपुर्ण माहिती दयावी.आपण त्यांना एवढे मानधन देतो त्याचा महानगरपालिकेला काय फायदा झाला आहे.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- ब्लड बॅक आपल्याला सुरू करायची असल्याने आपल्याकडे कर्मचारी नसल्याने आपण वर्तमान पत्रामध्ये जाहीरात दिली होती.त्यानंतर कोणीही डॉक्टर मुलाखती करीता आले नाही.फक्त टेक्नीशीयन सुपरवायझर आले होते.त्यांची आपण नेमणूक केली होती.ते काही हजर झाले नाही.एक जण हजर झाला होता तो पण नंतर सोडून गेला.त्यांना जास्त मानधनाची अपेक्षा आहे.दुसरीकडे त्यांना जास्त मानधन मीळते.त्यामुळे ते दुसरीकडे जॉईन झाले.सध्या आपल्याकडे फक्त होलब्लड चालू आहे.संपुर्ण रक्त,आपल्याला रक्ताचे विघटण करायाचे होते.त्याकरीता टेक्नीकल सुपरवायझरची आवश्यकता आहे.अन्न व औषध विभाग या शिवाय मान्यता देत नाही.एक एम.डी.डॉक्टर लागतो.डॉक्टरांची नियुक्ती आपण केलेली आहे.परंतु टेक्नीकल सुपरवायझर पद सध्या रिक्त आहे.याकरीता पुन्हा जाहिरात देवून पद भरावे लागणार आहे.त्यामुळे आपले रक्तविघटण चालू होवू शकले नाही.आपल्याला पुन्हा जाहिरात देवून,मानधनामध्ये वाढ करून पदे भरावी लागणार आहे.मानधन कमी आसल्याने आपल्याकडे माणसे टिकत नाही.सन्माननीय नळकांडे साहेबांचे म्हणण्या नुसार जे तीन कर्मचारी रक्तपेढी मध्ये भरले आहेत.रक्तपेढीमध्ये दोन कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.फक्त एक कर्मचारी ठेवला आहे.उर्वरीत सर्व कर्मचारी ज्या त्या वॉर्ड मध्ये टाकला आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागातील सेवानिवृत्त झालेले कर्मचा-यांना योग्य त्या मानधनावर सेवेत घेतले तर रक्तपेढी सुरळीत राहील.त्यांच्या अनुभवाचा फायदा होईल.

मा.सभपती साहेब :- तुमची सुचना योग्य आहे.डॉक्टर साहेब,असे जे सेवानिवृत्त कर्मचारी इच्छुक असतील तर त्यांना संपर्क करा.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- आपल्याकडे सध्या होलब्लड चालू आहे.आपल्याला आता रक्तविघटण चालू करायचे आहे.रक्तविघटण करण्याकरीता जो अनुभव पाहिजे ती त्यांच्याकडे नाही.आपल्याला अनुभवी कर्मचारी लागतील,ज्यांनी रक्तविघटणाचे काम केले आहे.

मा.सभापती साहेब :- रक्तविघटनाचे काम सोडून इतर कामा करीता आपल्याकडे जर चांगले कर्मचारी असतील तर त्यांचा विचार नक्की करावा.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- आपल्याला अनुभवी कर्मचारी लागतील.ज्यांनी रक्तविघटन प्रक्रीयेमध्ये काम कले आहे.

मा.सभापती साहेब :- कोरोना काळामध्ये रक्ताबाबतचा विषय महात्वाचा आहे.तीस-या लाटेची संभावणा पहाता आल्याला रक्तपेढी अदयावत करणे आवश्यक आहे.कोरोना रूग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे.कालच एक हजारपेक्षा जास्त कोरोना बाधीतांची संख्या होती.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- सेवानिवृत्त कर्मचा-यांनी काम चांगले केले होते.परंतु आपल्याला रक्तविघटन करावयाचे असल्याने अनुभवाचा विषय येतो.

मा.सभापती साहेब :- आपल्याना नव्याने मानधन वाढवून मानधनावर कर्मचारी घ्यावे लागणारच आहे.तीस-या लाटेची शक्यता असल्याने रक्तविघनाचा विषय आपल्याला गांभीर्याने घ्यावाच लागेल.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- सिव्हल हॉस्पीटल कडे सपर्क करून मानधना बाबत चौकशी केली आहे.त्यानुसार पत्र आल्यावर त्यानुसार मानधन ठरविता येईल.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढीच्या बाबत कोणतीही हयगय करू नका.काही अडचण आल्यास मा.आयुक्त साहेब व उपायुक्त साहेब यांचे बरोबर चर्चा करून मार्ग काढू.

मा.श्री.शाम नळकांडे :- सध्या आपल्या रक्तपेढी मध्ये किती रक्त बॅग शिल्लक आहेत.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- सहा बॅग आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- आत्ता आपण घेतले आहेत.त्यामुळे रक्तदान शिबीरांचे आयोजन केले का?

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- आपण आत्तापर्यत तीन ते चार शिबीरे घेतली.प्रत्येक शिबीरामध्ये १० ते १५ बॅगेचे संकलन केले.परंतु आपल्याकडे होल ब्लड आहे.होल ब्लड व रक्तविघटन यामध्ये फरक आहे.हॉस्पीटल मधील मागणी ही रक्तविघन रक्ताची आहे.होल ब्लडची मागणी नाही.आल्याकडील व्होलब्लडची बॅग आपण ३५ दिवस ठेवू शकतो.चार ते पाच कम्पमधून आपल्याकडील रक्तबॅग जमा झाल्या परंतु मागणी नसल्याने तशाच पडून राहील्याने डिसचार्ज कराव्या लागल्या.त्यामुळे आपले रक्तविघटण चालू होत नाही.तोपर्यत रक्त वाया घलविण्यात काही पॅइन्ट नाही असे मला वाटते.

मा.श्री.शाम नळकांडे :- आपल्याकडे जनसंपर्क अधिकारी कोण आहेत.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- संतोष काळे म्हणून जनसंपर्क अधिकारी आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- सध्या ते आपल्याकडे आहेत का?

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- हो,हजर आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- त्यांनी रक्तपेढी विभागामध्ये सन २०१३ मध्ये काम केले आहे का?

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- हो केले आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- त्यांनी महानगरपालिकेच्या विरोधामध्ये कोर्टामध्ये केस केली होती.तत्कालीन आयुक्तांनी त्यांची नियुक्ती रद्द केली होती.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- त्यांची नियुक्ती रद्द झाल्यानंतर ते कार्टात गेले होते.कामावर घ्यावे म्हणून.आकृतीबंधामध्ये ते पद मंजूर नाही.अन्न व औषध विभागाच्या नियमानुसार हे पद आवश्यक आहे.त्याशिवाय आपल्याला परवानगी मिळत नाही.त्यामुळे मा.आयुक्तांच्या अधिकारामध्ये हे पद भरले होते.कोर्टाने केस रिजेक्ट केली आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- त्यांना काढल्यानंतर ते कोर्टामध्ये गेले कि,अगोदरच कोर्टा मध्ये गेले होते.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- महानगरपालिकेने नियुक्ती रद्द केल्यानंतर ते कोर्टा मध्ये गेले होते.कोर्टामध्ये केस निकाली झाली.केस रिजेक्ट झाली आहे.

मा.सभापती साहेब :- निकाल कोणाच्या बाजुने लागला.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- केस रिजेक्ट झाली.पालीकेच्या बाजूने निकाल लागला.केस निल झाली.त्यानंतर ते मुलाखती करीता आले.व त्यांची निवड झाली.

मा.श्री.शाम नळकांडे :- पालीकेमध्ये काम करून पालिकेविरूध्द केस करणे चुकीचे वाटते.काही अडचण असेल तर त्यांनी मा.आयुक्त साहेबां बरोबर चर्चा करायला पाहिजे.ते आपल्या विरूध्द कोर्टात गेले,आपण पुन्हा त्यांनाच कामावर घेतो.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- केस रिजेक्ट झाल्यामुळे आपण त्यांना कामावर घेतले.

मा.श्री.शाम नळकांडे :- आपल्याच पालिकेच्या विरोधात गेल्याने त्याचे शल्य लागते.आपल्याकडे मानधनावरील कर्मचा-यांनी कामे केली पाहिजे.दोन ते तीन लाख रूपये या कर्मचा-यांवर दरमहा खर्च करतो आहोत.

मा.सभापती साहेब :- ज्याप्रमाणात त्यांच्यावर खर्च होतो.त्यानुसार त्यांच्याकडून काम होते का? त्याचा आउटपुट आपल्याला मिळतो का?

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- सध्याच्या परिस्थीतीमध्ये आपल्याला पाहिजे तेव्हढा आउटपूट मिळत नाही.

मा.सभापती साहेब :- आपले पैसे वाया जातात.महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती नाजुक आहे.हा चुकीचा विषय होतो.तुम्ही त्या विभागाचे प्रमुख असल्याने कामाचे नियोजन करा.आपण जर दोन लाख रूपये मानधन देतो,त्याचे आपल्याला समाधान होत नसेल तर ते बरोबर नाही.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- कर्मचारी अर्धवट हजर झाल्याने प्रॉब्लेम आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- तीस-या लाटेची शक्यता असल्याने रक्तविघन करणे आवश्यक आहे.या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत यावर आपण मा.आयुक्त साहेब यांचे बरोबर चर्चा करून मार्ग काढू.आपल्याला रक्तपेढी चालू ठेवावी लागणार आहे.महानगरपालिकेची ही जबाबदारी आहे.दुस-या लाटेमध्ये नागरीकांचे माठया प्रमाणात हाल झाले आहे.या गोष्टी आपल्या हातामध्ये आहेत.जर रक्तपेढी सुरू झाली नाही, तर याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची राहील.या करीता येणा-या अडचणींवर मार्गकाढून आपल्याला लवकर निर्णय घ्यावा लागणार आहे.

रक्तपेढी विभाग डॉ.शेडाळे :- या करीता थोडा वेळ दयावा लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- आपण चर्चा करून मार्ग काढू.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.भरण्यात आलेल्या काही पदांवरील कर्मचारी सोडून गेले असल्यास नव्याने जागा भरण्याची कार्यवाही करून रक्तपेढी मधील सर्व सुविधा सुरळीत होतील या दृष्टीने कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.रक्तपेढी करीता अपुरा कर्मचारी स्टाफ असल्यास योग्य त्या मानधनावर नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात टेक्नीकल या पदावर थेट पध्दतीने मुलाखती नुसार पात्र ठरवून निवड झालेल्या उमेदवारांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशास कार्योत्तर मंजुरी ही सभा देत आहे. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार कोरोना -१९ चा प्रर्दुभाव वाढत असून रक्तपेढी सुरळीत ठेवणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट नुसार नियुक्त झालेले कर्मचारी सोडून गेले असतील व नव्याने नेमणूक करणे बाबत आपल्या स्तरावर नियुक्ती बाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात टेक्नीकल या पदावर थेट पध्दतीने मुलाखती नुसार पात्र ठरवून निवड झालेल्या उमेदवारांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशास कार्योत्तर मंजुरी ही सभा देत आहे. सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार कोरोना -१९ चा प्रर्दुभाव वाढत असून रक्तपेढी सुरळीत ठेवणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट नुसार नियुक्त झालेले कर्मचारी सोडून गेले असतील व नव्याने नेमणूक करणे बाबत आपल्या स्तरावर नियुक्ती बाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५६** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.मुळे प्रमोद, वीजतंत्री श्री.फडके मधुसुदन,गाळणी निरिक्षक,श्री.सोनवणे कैलास,वाहनचालक या सेवानिवृत्त कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजना

संदर्भ- १. जा.क्र.पा.पु. कंत्राटी करारबध्द नेमणूक १०२७ दि.२३/०३/२०२१ अन्वये कार्यालयीन आदेश.
२. गाळणी चालक श्री.लांडगे बी.डी.यांचा दि.०८/०६/२०२१ चा रिपोर्ट.
३. श्री.फडके मधुसुदन दत्तात्रय व श्री.सोनवणे कैलास रघुनाथ यांचा दि.०६/४/२०२१रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषयान्चये विनंती रिपोर्ट की,संदर्भीय कार्यालयीन आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवे करीता कंत्राटी करारानुसार खालील नमुद कर्मचारी हुद्याप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर दि.०९/०७/२०२० रोजी पासून ६ महिन्या करीता निर्देशीत अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भीय आदेशातील पाणी पुरवठा विभागाकरीता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवर खालील निर्देशीत ठिकाणी नेमणूक करण्यात आलेली होती.

कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.०८/०१/२०२१ रोजी संपुष्टात आलेली असल्याने मुदतवाढ मिळणे कामी वरील नमुद संदर्भीय कर्मचारी यांची कर्मचारी यांनी दि.०८/०६/२०२१ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमोद काशिनाथ मुळे ,सेवानिवृत्त | वीजतंत्री | रू.१२०००/- | शहर पाणी पुरवठा योजनेवरील दैनंदिन देखभाल दुरूस्ती |
| २ | फडके मधुसुदन दत्तात्रय,सेवानिवृत्त | गाळणी निरीक्षक | रू.१२,०००/- | जलशुध्दीकरण केंद्र विळद व वसंतटेकडी येथील दैनंदिन देखभाल व तद्नुषंगीक कामे |
| ३ | सोनवणे कैलास रघुनाथ,सेवानिवृत्त | वाहनचालक | रू.१२,०००/- | शहर पाणी पुरवठा योजनेवरील मेंटनन्स विभागाकरिताचे वाहनावर वाहनचालक |

यास्तव पाणी पुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वरील नमुद तांत्रिक हुद्याप्रमाणे वरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे.

तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१०००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ मधील कार्यपध्दतीप्रमाणे उपरोक्त नियुक्या विहत मार्गाने करण्यात आलेल्या आहेत याची विभागाने खत्री करून मुदतवाढी बाबत विभागाला उचित कार्यवाही करता येईल.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक /मुख्यलेखाधिकारी यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल की, फेरसादर, विषयांकीत बाबत विनंती रिपोर्ट फेर सादर की,मा.स्थायी समिती सभा क्र.४ विषय क्रमांक ४९ दि.११/११/२०२० अन्वये पारीत ठरावानुसार व मा.आयुक्त यांची दि.१८/०३/२०२१ रोजीची मंजुरीने जा.क्र.पा.पु.कंत्राटी करारबध्द नेमणूक १०२७ दि.२३/०३/२०२१ आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात व्हॉलमन / मदतनीस पदांवर दि.०९/०७/२०२० रोजी पासून ६ महिन्याकरीता निर्देशीत अटी व शर्ती प्रमाणे सेवानिवृत्त झालेले खालील नमुद कर्मचारी यांची प्रत्येकी दरमहा मानधन रूपये १२,०००/- प्रमाणे कंत्राटी करारबध्द नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | रूजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | प्रमोद काशिनाथ मुळे , सेवानिवृत्त | वीजतंत्री | शहर पाणी पुरवठा योजनेवरील दैनंदिन देखभाल दुरूस्तीची कामे |
| २ | फडके मधुसुदन दत्तात्रय, सेवानिवृत्त | गाळणी निरीक्षक | जलशुध्दीकरण केंद्र विळद व वसंतटेकडी येथील दैनंदिन देखभाल व तद्नुषंगीक कामे |
| ३ | सोनवणे कैलास रघुनाथ, सेवानिवृत्त | वाहनचालक | शहर पाणी पुरवठा योजनेवरील मेंटनन्स विभागाकरिताचे वाहनावर वाहनचालक |

सदर नेमणूकीची मुदत दि.०८/०१/२०२१ रोजी संपुष्टात आलेली असल्याने व पाणी पुरवठा योजनेच्या दैंनदिन देखभाल व दुरूस्ती कामासाठी विभागास कर्मचा-यांची आवश्यकता लक्षात घेता मा.स्थायी समितीच्या मंजुरीने तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरिता अटी व शर्तीप्रमाणे मानधनावर मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी सादर करणे संयुक्तीक राहिल आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त कर यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.मुळे प्रमोद, वीजतंत्री श्री.फडके मधुसुदन,गाळणी निरिक्षक,श्री.सोनवणे कैलास रघुनाथ,वाहनचालक या सेवानिवृत्त कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री.प्रमोद काशिनाथ मुळे, ,गाळणी निरिक्षक यापदी श्री.फडके मधुसुदन दत्तात्रय व वाहनचालक यापदी श्री.सोनवणे कैलास रघुनाथ या सेवानिवृत्त कर्मचा-यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री यापदी श्री.प्रमोद काशिनाथ मुळे, ,गाळणी निरिक्षक यापदी श्री.फडके मधुसुदन दत्तात्रय व वाहनचालक यापदी श्री.सोनवणे कैलास रघुनाथ या सेवानिवृत्त कर्मचा-यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५७** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.बाळू लक्ष्मण शिंदे वॉलमन / मदतनीस यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकूर :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजना

संदर्भ- १. जा.क्र. पा.पु. कंत्राटी करार बध्द नेमणूक १००७ दि.१८/३/२०२१

२. श्री. बाळू लक्ष्मण शिंदे, व्हॉलमन / मदतनीस यांचा दि.२३/०३/२०२१ रोजीचा विनंती अर्ज

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, संदर्भिय कार्यालयीन आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार सेवानिवृत झालेले कर्मचारी श्री. बाळू लक्ष्मण शिंदे, व्हॉलमन/ मदतनीस यांची तात्पुरत्या स्वरूपात पदावर दि.०९/०७/२०२० रोजी पासून ६ महिन्याकरीता निर्देशित अटी व शर्ती प्रमणे मानधनावर करारबध्द नेमणूका करण्यात आलेली होती.

संदर्भिय आदेशातील पाणी पुरवठा विभागाकरीता नियुक्त केलेले श्री. बाळू लक्ष्मण शिंदे कर्मचारी यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव उपकार्यालय अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था देखभाल व दुरूस्ती कामासाठी दरमहा मानधन रूपये १०,०००/- प्रमाणे कंत्राटी करारबध्द नेमणूक करण्यात आलेली होती.

कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.०८/०१/२०२१ रोजी संपुष्टात आलेली असल्याने मुदतवाढ मिळणे कामी संदर्भिय कर्मचारी यांनी विनंती अर्ज दिलेला आहे.

यास्तव पाणीपुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात श्री.बाळू लक्ष्मण शिंदे,व्हॉलमन/ मदतनीस यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या केडगाव उपकार्यालय अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था देखभाल व दुरूस्ती कामासाठी नियमानुसार तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सह महिन्याकरित अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे. तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.लेखा परिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.-१०००/१३- दि.१७ डिसेंबर २०१६मधील कार्यपध्दतीप्रमाणे उपरोक्त नियुक्त विहीत मार्गाने करण्यात आलेल्या आहेत यांची विभागाने खात्री करून मुदतवाढी बाबत विभागाच्या उचित कार्यवाही करता येईल.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मुलेप /मुलेअ यांच्या अभिप्रायानुसार आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, As proposed for Standig

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- अहमरनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे कारीता श्री.बाळू लक्ष्मण शिंदे वॉलमन / मदतनीस यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिन्याकरीता नियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वॉलमन / मदतनीस यापदी श्री.बाळू लक्ष्मण शिंदे, या म.न.पा.मधून सेवानिवृत्त कर्मचा-याला तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वॉलमन / मदतनीस यापदी श्री.बाळू लक्ष्मण शिंदे या म.न.पा.सेवानिवृत्त कर्मचा-यास तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५८** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार संतोष हस्तीमल गुगळे, रा.चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.९ बील क्र. ७०५ या मालमत्ता कराची आकारणी दुरूस्ती शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग
संदर्भ- दिनांक ५/१/२०२१ रोजीचा महानगरपालिकेकडे दाखल अर्ज

प्रभाग समिती क्र. २ शहर वसुली विभाग वॉ. क्र. ९ चे वसुली लिपिक यांचेकडून विनंती प्रस्ताव देण्यात येतो की, वॉर्ड क्र.९ बिल क्र.७०५ हस्तीमल पनालाल गुगळे, घर नं.४२५५/२, चितळे रोड ,अ.नगर व बिल क्र.७१० श्री. गुगळे, घर नं.४२५३, चितळे रोड या नावे परिशिष्ट अ फॉर्म मिळकती नोंदी आहेत. बि क्र.७०५ वर तत्कालीन आर्थिक वर्षामध्ये कर आकारणी फेर मुल्यांकन सर्व्हेमध्ये बांधकाम चालू आहे. यास्तव सदर जागेबाबत ओपनजागा क्षेत्र १६८.७८ चौ.मी. नमुद केले असुन सदर क्षेत्रास ओपन जागेचे कर आकारणी करण्यात आलेली आहे.

याच मिळकतीवरील नवीन बांधकामाबाबतची नोंद बिल क्र.७१० वर घेण्यात आलेली असुन आर.सी.सी. तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला यांचे एकुण क्षेत्र ४३५.२९ चौ.मी. वर कर आकारणी करण्यात आलेली आहे.

वास्तविक पहाता बिल क्र.७१० वरील नोंद ही बिल क्र.७०५ वर तत्कालीन कर्मचारी यांनी नोंद घेणे क्रमप्राप्त असताना स्वतंत्र रित्या बिल क्र.७१० वर नवीन बांधकामाची नोंद घेउन आकारणी करणेत आली. उक्त मिळकतीचे दुबार म्हणजेच मोकळया जागेचे व नवीन बांधकाम आकारणी अशी दोन बीले देण्यात येतात. सदर मालमत्ता धारक यांनी अर्जात यापुर्वी वेळोवेळी अर्ज दाखल केले असले बाबत नमुद केले आहे. तसेच सदर मिळकत ही एकच असुन मिळकतीस एक नळ कनेक्शन असुन दोन्ही बीलावर अर्धा इंची नळ कनेक्शनची नोंदी झालेल्या आहेत. तथापी मालमत्ता धारक अर्जदार श्री. गुगळे यांनी दि.०५/०१/२०२१ रोजी दाखल केलेल्या अर्जावरून इकडील अभिलेख पडताळणी नुसार सन २०२०-२०२१ अखेर बिल क्र.७०५ हे मोकळी जागेची बिल व त्यावरील घरपटटी व पाणीपटटीमुळ रक्कम रू.९६७९४/- महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नगरपालिका कराधान प्रकरण ११ कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेाित करणेबाबत तसे उक्त मिळकतीवरील शास्ती रक्कम रू.१६३४१३/- महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कराधान प्रकरण ८ कलम ५१ नुसार शास्ती फी किंवा वसुलीची खर्च माफ करता येईल. मा.आयुक्त साहेब यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतुद असुन उक्त तरतुदीचे अनुषंगाने उक्त मालमत्ता धारक यांचे अर्ज व अभिलेखा पडताळणी नुसार व कलम १५२ नुसार व नियम ५० अन्वये बिल क्र.७०५ व त्यावरील एकुण रक्कम रू.२६०२०७/- निर्लेखित करणे कामी प्रस्ताव मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे प्रस्तावानुसार सविनय सादर.

यावर सहा.आयुक्त तथा प्रभाग अधिकारी क्र.२ यांचा अभिप्राय की, १. सदर जागेची समक्ष पाहणी करून पाहणी अहवाल जोडावा., २. निर्लेखित होणारी रक्कम व वसुल योग्य रक्कम तक्ता स्वरूपात सादर कराव्यात.

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर , प्रस्तुत प्रकरणी दि.१५/०२/२०२१ चे शेरांकनानुसार पृष्ठ क्रमांक २ वर स्थळ पहाणी अहवाल जोडण्यात आलेला आहे.

बि.क्र.७०५ वरील खुल्या भुखंडाची आकारणी दुबार व नळनोंद दुबार नोंद झालेने यावरील रक्कम रूपये ९६७९४/- व यावरील सन २०२०-२०२१ अखेर शास्ती रक्कम रू.१,६३,४१३/- अशी एकुण रक्कम रू.२,६०,२०७/- संपुर्ण रकमेसह दुबार बिल निर्लेखित करणे बाबत सादर.

यावर सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर नुसार मान्य करण्यास हरकत नाही.तथापी मान्यतेस्तव सादर.

यावर सहा.कर मुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार मा.क्र.७०५ व ७१० वरील दोन्ही मिळकत एकाच मालकाच्या नांवे होती.सन २००१/०२ मध्ये दोन्ही मिळकती मिळुन नविन इमारतीचे बांधकाम पुर्ण होवून कर आकारणी झाली होती.त्यातील मा.क्र.७०५ हा रद्द करणे आवश्यक होते परंतु ते रद्द न केल्यामुळे त्यावरील खुल्या जागेची आकारणी अदयापही चालू आहे.सन २०२०-२०२१ अखेरची रक्कम रू.२,६०,२०७/- इतकी आहे.हि रक्कम वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुळ टिपणीच्या अ बाबत चर्चा करा.

यावर सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,मा.साहेबांच्या निर्देशानुसार दप्तर दिरंगाईसाठी संबंधीत वसुली लिपीक यांना कारणे नोटीस देण्यात आली होती.त्याबाबतचा प्राप्त खुलाशानुसार एक वेळ माफी देण्यास हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अर्जदार संतोष हस्तीमल गुगळे, रा.चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.९ बील क्र. ७०५ या मालमत्ता कराची आकारणी दुरूस्ती शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५८ ते ६१ हे विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.याच बरोबर विषय क्रमांक ५८ ते ६१ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५८ ते ६१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार संतोष हस्तीमल गुगळे, रा.चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.९ बिल क्र.७०५त्यावरील मालमत्ता कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत येत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ५९** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.राजेंद्र गंगाधर राउत,कुंभार गल्ली ,तोफखाना,.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बील क्र. १०४९ नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची केलेली आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक २ शहर वसुली विभाग

संदर्भ- १. दिनांक ०१/०४/२०२१ रोजीचा अर्ज.

शहर वसुली विभाग प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड नं.२ वसुली लिपीक यांजकडून विनंती प्रस्ताव देण्यात वॉर्ड नं.२ बिल नं.१०४९ रोजेंद्र गंगाधर राउत रा.कुंभार गल्ली,तोफखाना ८१६ अहमदनगर या नांवे वसुली अभिलेखा नोंद आहे.मालमत्ता धारक यांनी दिनांक १/४/२०२१ रोजी ईकडील कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जावर प्रभाग समिती क्र.२ पाणीपुरवठा विभागाकडील मदतनीस व हेड फिटर यांनी दिनांक ८/७/२०२१ रोजी सदर समक्ष स्थळ पहाणी केली असता नळ कनेक्शन आढळुन नाही.असे रिपोर्ट दिलेला आहे.

मिळकतधारक यांनी दाखल केलेल्या अर्ज व पाणीपुरवठा मदतनीस फिटर व हेड फिटर यांचे रिपोर्ट नुसार उक्त मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना आकारणेत आलेली पाणपट्टी सन २०१८ ते २०२१ अखेर एकुण रक्कम रू.७५००/- महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ११ कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत मा.आयुक्तांस मा.स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्यांच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल तथापी उक्त तरतुदी नुसार रक्कम रू.७५००/- निर्लेखित करणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरिक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावानुसार तसेच प्र.स.क्र.२ पाणी पुरवठा फिटर व हेडफिटर यांचे रिपोर्ट नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहा.मुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की, सदर प्रकरणी अर्जदार यांचे अर्जानुसार पाणीपुरवठा फिटर यांचे अहवाला नुसार सदर जागे मध्ये नळ कने. नसल्याने विभागाने सादर केलेल्या प्रस्ताव अ नुसार मान्यतेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (कर) यांचा प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी समितीस सादर करणेस मान्यता मिळणे बाबत.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अर्जदार श्री.राजेंद्र गंगाधर राउत,कुंभार गल्ली ,तोफखाना,.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बील क्र. १०४९ नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची केलेली आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५८ ते ६१ हे विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.याच बरोबर विषय क्रमांक ५८ ते ६१ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५८ ते ६१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री.राजेंद्र गंगाधर राउत,कुंभार गल्ली ,तोफखाना,.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बील क्र. १०४९ वर नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची केलेली आकारणीची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६०** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.बसवराज काशप्पा पारशेट्टी रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३७ व १०३८ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८ वरील घरपट्टीची आकरणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,श्री.बसवराज काशप्पा पारशेट्टी रा.इवळे मळा,सारसनगर यांनी इकडेस अर्ज देवून कळविले की,त्यांचे एकाच मालमत्तेचे दोन घरपट्टीचे बिले येत आहेत.परंतु मालमत्ता एकच आहे.तरी माझे मालमत्तेची झालेली डबल नोंदीची संगणकात दुरूस्ती करावी आणि दोन बिलापैकी एक बिल रद्द करावे या प्रमाणे अर्ज दिलेला आहे.

.बसवराज काशप्पा पारशेट्टी यांचे मालमत्तेची नोंद वॉर्ड नं.२८ मध्ये असुन त्यांचे बिल नंबर अनंक्रमे १) Z४२८११०४७८ जुना बिल नंबर १०३७ २) Z४२८११०४८१ जुना बिल नं.१०३८याप्रमाणे दोन मालमत्तांची नोंद आहे.अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पहाणी केली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.मनपाचे मालमत्ता रजिष्टरला नजर चुकीने दोन मिळकतींची नोंद झालेली आहे.सदर दोन्ही मिळकतीचे करयोग्य मुल्य ११२१० आहे.अर्जदाराने दोन्ही मिळकती पैकी बिल नं. Z४२८११०४७८ वरील मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत असल्याने बिल नं. Z४२८११०४७८ हे बिल तसेच ठेवून झालेल्या डबल नोंदीचे बिल नं. Z४२८११०४८१ हे रद्द होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२१-२०२२ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकुण थकबाकी रक्कम रू.१२२७९८/- ही वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रंतिक महानगरपालिका अधिनियम १५२ अन्वये निर्लीखीत करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक ,करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार संबंधित अर्जदाराचे मिळकतीची मनपा मालमत्ता कर रजिष्टरला डबल नोंद असलेचे आढळून आलेले आहे.सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १५२ अन्वये डबल नोंदीचे बिल Z४२८११०४८१ हे रद्द करून सदर बिलावरील सन २०२१ -२२ अखेर मालमत्ता कर व इतर कर रक्कम रू.१२२७९८/- निर्लेखीत करणे कामी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक मुल्य निर्धारक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार कार आकारणी करतांना तत्कालीन कर्मचारी यांनी ओपन प्लॉटची नोंद असतांना जागे बाबतची खात्री न करता मा.क्र. Z४२८११०४७८ वर घराच्या आकारणीची नोंद घेतली होती.परंतु परत मा.क्र. Z४२८११०४८१ व घराची आकारणीची नोंद घेतलेली आहे.त्यामुळे एकाच मिळकतीच्या कर आकारणीची डबल बिल येत आहे.मा.क्र. Z४२८११०४७८ वर मालमत्ताधारक कराची रक्कम भरत आहेत मा.क्र. Z४२८११०४८१ वरील कराची रक्क्म वसुल न होणारी असल्याने मा.क्र. Z४२८११०४८१ ही मालमत्ता रद्द करून त्या बिलावरील रक्क्म रू.१२२७९८/- इतकी रक्क्म महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने १२२७९८/- निर्लेखित करणे विषयी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- अर्जदार श्री.राजेंद्र गंगाधर राउत,कुंभार गल्ली ,तोफखाना,.नगर यांना प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.२ बील क्र. १०४९ नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची केलेली आकारणी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५८ ते ६१ हे विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.याच बरोबर विषय क्रमांक ५८ ते ६१ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५८ ते ६१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री.बसवराज काशप्पा पारशेट्टी रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. मा.क्र. Z४२८११०४७८ व Z४२८११०४८१ वर एकाच मालमत्तेची डबल नोंद झाली असल्याने मालमत्ता क्र. Z४२८११०४८१ रद्द होणेस व त्यावरील रक्कम निर्लेखित करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६१** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ.वैशली दिलीप मेहेर रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३६ व १०३८/१ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८/१वरील घरपट्टीची आकरणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,वैशाली दिलीप महेर राहणार इवळे मळा सारसनगर यांनी इकडेस अर्ज देवून कळविले की,त्यांचे एकाच मालमत्तेचे दोन घरपट्टीचे बिल येत आहेत.परंतु मालमत्ता एकच आहे.तरी माझे मालमत्तेची झालेली डबल नोंदीची संगणकात दुरूस्ती करावी आणि दोन बिलांपैकी एक बील रदद करावे याप्रमाणे अर्ज दिलेला आहे.

वैशाली दिलीप मेहेर यांचे मालमत्तेची नोंद वॉर्ड नं.२८ मध्ये असुन त्यांचे बील नंबर अनुक्रमे १] Z४२८११०४७७ जुना बिल नंबर १०३६ ,२] Z ४२८११०४८० जुना बिल नं.१०३८/१ याप्रमाणे दोन मालमत्तांची नोंद आहे.अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पहाणी केली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मनपाचे मालमत्ता रजिष्टरला नजर चुकीने दोन मिळकतीची नोंद झालेली आहे. सदर दोन्ही मिळकतीचे करयोग्य मुल्य ५४०० आहे. अर्जदाराने दोन्ही मिळकती पैकी बील नं.Z४२८११०४७७ वरील मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत असल्याने बिल नं.Z४२८११०४७७ हे बिल तसेच ठेवुन झालेल्या डबल नोंदीचे बिल नं.Z४२८११०४८० हे रदद होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२१-२०२२ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकुण थकबाकी रक्कम रूपये ८३१७६/- ही वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १५२ अन्वये निर्लेखित करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस बाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक , कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार संबंधीत अर्जदारचे मिळकतीची मनपा मालमत्ता कर रजिष्टरला डबल नोंद असलेचे आढळुन असलेले आहे सबब महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १५२ अन्वये डबल नांदीचे बिल नं.Z४२८११०४८० हे रदद करून सदर बिलावरील सन २०२१-२०२२ अखेर मालमत्ता कर व इतर कराची रक्कम रू.८३१७६/- निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा. सहा. मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधि. यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार कर आकारणी करतांना तत्कालीन कर्मचारी यांनी ओपन प्लॉटची नोंद असतांना जागेबाबतच्या नोंदीची खात्री न करता मा.क्र.Z४२८११०४७७ वर घरांच्या आकारणी नोंद घेतली होती परंतु परत मा.क्र.Z४२८११०४८० वर घराच्या आकारणी नोंद केलेली आहे त्यामुळे एकाच मिळकतीच्या कर आकारणीचे डबल बील यत आहे मा.क्र.Z४२८११०४७७ मालमत्ता धारक कराची रक्कम भरत आहेत मा.क्र.Z४२८११०४८० वरील कराची रक्कम भरत नसल्याने Z४२८११०४८० ही मालमत्ता रदद करून त्यावरील रक्कम वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने रू.८३१७६/- निर्लेखित करणे विषयी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर/अ

यावर मा. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा. सभापती साहेब :- अर्जदार सौ.वैशाली दिलीप मेहेर रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३६ व १०३८/१ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८/१वरील घरपट्टीची आकरणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ५८ ते ६१ हे विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.याच बरोबर विषय क्रमांक ५८ ते ६१ मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ५८ ते ६१ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे असल्याने या विषयांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार सौ.वैशाली दिलीप मेहेर रा.इवळे मळा,सारसनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२८ बील क्र. १०३६ व १०३८/१ एकाच मालमत्तेस दुबार कराची आकारणी झाल्याने बील क्रमांक १०३८/१ वरील घरपट्टीची आकरणीची Z४२८११०४८० ही मालमत्ता रदद करून व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६२** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका कोविड सेंटर करीता ऑक्सीजन Concentrator Single Ourlet 7 Liters /Min Capacity With Stndard Accessories -100 Nos.GeM पोर्टलवर खरेदी प्रक्रिया करून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका कोव्हिड केअर सेंटर करिता - Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories - 100 Nos खरेदी करीता GeM पोर्टलवर Bid Number-GEM/2021/B/1254632 Dated-02/06/2021 अन्वये प्रसिध्द केले असता मुदतीत -

१)जे.पी.सिंघलअँण्ड कंपनी,राजस्थान
२)विशाल एजन्सीज्,अहमदनगर
३)स्टार टेलेटेक सिस्टीम्स्,नवी दिल्ली
४)नॉर्थइस्ट कंन्स्ट्रक्शन,नागपूर
५)साक्षी सेल्स् अँण्ड सोलूशन्स,इंन्दौर,मध्य प्रदेश
६)महावीर फार्मा,अहमदनगर
७)मिंन्टेक इंन्फ्रा प्रोजेक्टस्,नागपूर
८)एस.एस.मेडीकल सिस्टीम्स् (इंडीया) प्रायव्हेट लिमिटेड,भिमतल,नैनीताल
९)अनालिटीकल इंन्स्ट्रयुमेंटस् सोलुशन्स्,बडोदरा,गुजरात

याप्रमाणे एकूण नऊ निविदा दरपत्रके प्राप्त झालेली असून त्यातील १)जे.पी.सिंघलअँण्ड कंपनी,राजस्थान २)विशाल एजन्सीज्,अहमदनगर ३)स्टार टेलेटेक सिस्टीम्स्,नवी दिल्ली ४)महावीर फार्मा,अहमदनगर ५)मिंन्टेक इंन्फ्रा प्रोजेक्टस्,नागपूर या पाच निविदा दरपत्रकातील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने ते अग्राहय करण्यात येवून उर्वरीत चार ग्राहय निविदाकारांचे दराचे लिफाफे उघडण्यात आलेले असून Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories - 100 Nos करिता खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण लघुत्तम किंमत प्राप्त झालेली आहे.

लघुत्तम किंमतधारक पुरवठादाराचे नाव - साक्षी सेल्स् अँण्ड सोलूशन्स,इंन्दौर,मध्य प्रदेश

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | परिमाण | Bid Number / दिनांक | GeM पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| 1) | Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories | 100 Nos. | GEM/2021/B/1254632 Date.02/06/2021 | 39,89,000=00 |
| | | | **Total Rs.** | **39,89,000=00** |

वरील तक्यातील कॉलम क्र.२ मधील साहित्य कॉलम क्र.३ मध्ये नमुद परिमाणानुसार कॉलम क्र.५ मध्ये नमुद GeMपोर्टलवरील प्राप्त लघुत्तम किंमतीत खरेदीस रक्कम रुपये.३९,८९,०००=००फक्त खर्च येईल.

मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उदयोग-४ दि.२४ ऑगस्ट २०१७अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस(GeM)पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतच्या शासन निर्णयातील अ.नं.५ खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM)पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांची रु.३लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठादारांकडून वस्तू व सेवांची गुणवत्ता,विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ.आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाव्दारे (Online bidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्यात यावी.अशी तरतूद असून त्याप्रमाणे खरेदी प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

निविदाकार साक्षी सेल्स् अँण्ड सोल्युशन्,इंदौर,मध्य प्रदेश यांनी दि.१५/०६/२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे पत्रान्वये DEDAK J कॉन्सनट्रेटर करिता दोन वर्ष वॉरंटी कालावधी दिलेला असून गरजेनुसार अहमदनगर येथे साईटवर दुरुस्ती करुन दिली जाईल तसेच मेजर फॉल्ट असल्यास नवीन मशीन बदली पुरवठा केले जाईल असे कळविलेले आहे.

तरी मा.केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस(GeM)पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम किंमतीत Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories,Make - Dedak,Model - DE-1A,Oxygen Purity of 93% (± 3%) - 100 Nos खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.३९,८९,०००=००फक्त(अक्षरी रक्कम रुपये.एकोणचाळीस लक्ष एकोननव्वद हजार)फक्तच्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर करणेस मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.

**<u>अंदाजपत्रकिय तरतूद - सन.२०२१-२०२२</u>**

लेखाशिर्ष - कोव्हिड-१९ अनुदानातून खर्च

तरतूद - रु.५,३६,९२,०००=००

आतापर्यंत झालेला खर्च - रु.४,३३,८२,८२५=००

प्रस्तावित खर्च - रु.२३,१०,०००=०० + रु.१६,७९,०००=००

एकूण खर्च - रु.४,५०,६१,८२५=००

उपलब्ध शिल्लक - रु.८६,३०,१७५=००

प्रस्तावित बजेट रजिष्टर पान नं. ४/२४ व ८/५४ वर नोंद आहे.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, श्री. जाधव लिपिक आरोग्य विभाग SDRF प्राप्त कोव्हीड निधी उपरोक्त बाबीबाबत शिल्लक तरतुद नमुद करून सादर करणे

यावर आरोग्य विभाग लिपिक यांचा अभिप्राय की, फेर सादर , उपरोक्त बाबीबाबत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) निधीतून खर्च करणेस हरकत नाही. तथापी मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, SDRF प्राप्त कोव्हीड निधीतून खरेदी मान्येस्तव शिफारसीसह तथापी आदेशार्थ

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, निधी बाबत विभागाने खात्री करून प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस हरकत नसावी.

यावर मा. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मान्यतेसाठी सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिका कोविड सेंटर करीता ऑक्सीजन Concentrator Single Ourlet 7 Liters /Min Capacity With Stndard Accessories -100 Nos.GeM पोर्टलवर खरेदी प्रक्रिया करून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- उपायुक्त श्री. डांगे साहेब या विषयाची माहिती सांगा.

मा.उपायुक्त श्री. डांगे साहेब :- संभाव्य तिस-या लाटेची शक्यता लक्षात घेता. अहमदनगर महानगरपालिका कोव्हिड केअर सेंटर करिता Oxygen Concentrator Single outlet 7 Liters/ Min Capacity with Standard accessories - 100 Nos खरेदी करीता GeM पोर्टलवर प्रसिध्दी देवुन निविदा मागविल्या होत्या. याकरिता एकूण नऊ निविदा दरपत्रके प्राप्त झालेल्या आहे. यामधील एकूण लघुत्तम किंमत निविदाकार साक्षी सेल्स् अँण्ड सोल्युशन्,इंदौर,मध्य प्रदेश यांची आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- या १०० नग व्यतिरिक्त पुढील काळात आणखी ऑक्सीजनची गरज भासल्यास पुन्हा निविदा प्रक्रिया कार्यालयीन कार्यवाही यात वेळ जाईल आपण आत्ताच तयारी करून ठेवू

मा.श्री. सागर बोरूडे :- सध्या मा.शासनाच्या निर्देशित केल्याप्रमाणे व तिस-या लाटेची शक्यता लक्षात घेता. व मा.उपायुक्त साहेब यांच्या म्हणण्यानुसार इतरांशी तुलना करता सर्वात कमी दर असल्याने भविष्यात गरज वाटल्यास या एजन्सीकडून याच दरात भविष्यात लागणारे ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मागील काही दिवसामध्ये राज्यातील सर्वच जिल्हयामध्ये कोविड-१९ रूग्णांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ २ ते ३ पट असल्यामुळे सर्वच रूग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. सद्यपरिस्थितीमध्ये बहुतांश जिल्हयांमध्ये कोवीड रूग्णालये व कोवीड आरोग्य केंद्रामध्ये क्षमतेपेक्षा जास्त रूग्ण दाखल आहेत. त्यामुळे ऑक्सीजन आवश्यक त्या रूग्णांना देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने दि.२४/४/२०२१ रोजीच्या निर्देशानुसार एकुण बेडच्या २५% ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर असावेत. असे निर्देशित करण्यात आले आहे. तसेच सध्या मा.शासनाच्या निर्देशित केल्याप्रमाणे व तिस-या लाटेची शक्यता लक्षात घेता. कोरोना विषाणु (कोव्हिड -१९) चा प्रर्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मा.केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टवरील प्राप्त लघुत्तम किंमतीत १०० नग ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर खरेदी करण्यास मान्यता देत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा असल्याने पुढील काळात आणखी ऑक्सीजनची गरज भासल्यास पुन्हा निविदा प्रक्रिया कार्यालयीन कार्यवाही यात वेळ जाईल आपण आत्ताच तयारी करून ठेवू या एजन्सीकडून याच दरात भविष्यात लागणारे आणखी ५० नग ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका कोविड सेंटर करीता Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories,Make - Dedak,Model - DE-1A,Oxygen Purity of 93% (± 3%) - 100 Nos खरेदीस मा.केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस(GeM)पोर्टलवरील प्राप्त लघुत्तम किंमतीत निविदाकार साक्षी सेल्स् अँण्ड सोल्युशन्,इंदौर,मध्य प्रदेश यांच्याकडून दोन वर्ष वॉरंटी कालावधी दिलेला असून गरजेनुसार अहमदनगर येथे साईटवर दुरुस्ती करुन दिली जाईल तसेच मेजर फॉल्ट असल्यास नवीन मशीन बदली पुरवठा केले जाईल या अटी व शर्ती नुसार खरेदी करण्यास व खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा असल्याने पुढील काळात ऑक्सीजनची गरज भासल्यास या एजन्सीकडून याच दरात भविष्यात लागणारे आणखी ५० नग Oxygen Concentrator Single outlet 7 Liters / Min Capacity with Standard accessories,Make - Dedak,Model - DE-1A,Oxygen Purity of 93% (± 3%) ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. शाम नळकांडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६३** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितेतर सुधार योजना सन-२०२०-२०२१ अंतर्गत प्रभाग क्र.६ मधील वैदुवाडी चौक,शुभ मंगल कार्यालय पर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत ई-निविदा क्र. ६७६४८२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग
उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.
१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची दि.३१/०३/२०२१
२.ई -निविदा क्रमांक :- ६७६४८२/सन २०२१-२०२२ दि.१६/०४/२०२१
३.निविदा विक्री कालावधी :- दि.१६/०४/२०२१ ते दि.३०/०४/२०२१
४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१६/०४/२०२१ ते दि.३०/०४/२०२१
५.निविदा उघणेचा दिनांक :- दि.०३/०५/२०२१
६.कामाची मुदत:- ६ महिने
७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील :- दि.०२/०६/२०२१ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई -निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६७६४८२ | वैदुवाडी चौक शुभमंगल कार्यालयपर्यत गटर व रस्ता विकसित करणे | २९,५४,८५०/- | अभिजीत काळे अ.नगर | निविदा दरापेक्षा १०.५१% कमी दराने | अभिजीत काळे अ.नगर<br><br>निविदा दरापेक्षा १०.५१% कमी दराने |
| | | | मे.ए.पी.सोनीमंडलेचा | निविदा दरापेक्षा १०.५१% कमी दराने | |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक अभिजीत काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १.५१% कमी दराने भरली आहे.सदरची निविदा कमी दराची आहे.याकामी कमी दराच्या निविदाधारकाने रक्कम रू.६०,०००/- डी.डी.०९५५९ दि.२१/०६/२०२१ (भारतीय स्टेट बॅक,अ.नगर) मुदतीत जमा केली आहे.

तरी अभिजीत काळे,अ.नगर यांची सर्वात कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रायकी, महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्ररण ७ मधील कलम ७३-क प्रमाणे विभागाने कार्यवाही करिता प्रस्तावित अ प्रमाणे निविदा दरापेक्षा १०.५१% कमी दराची निविदा कार्यवाहीस्त सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (सा) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा. उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्याप्रमाणे १०.५१% कमी दराने मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितेतर सुधार योजना सन-२०२०-२०२१ अंतर्गत प्रभाग क्र.६ मधील वैदुवाडी चौक,शुभ मंगल कार्यालय पर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत ई-निविदा क्र. ६७६४८२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

शहर अभियंता या विषयाची माहिती सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.सुरेश इथापे :- वैदुवाडी चौक शुभमंगल कार्यालयपर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत ई-निविदा क्र. ६७६४८२ प्रसिध्द करण्यात आली होती.सदर निविदेमध्ये दोन निविदा धारकांनी निविदा दाखल केली होती. निविदाधारक अभिजीत काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १०.५१ % कमी दराने भरली आहे.सदरची निविदा कमी दराची आहे. सर्वात कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आली आहे.

मा.सभापती साहेब :- मा.श्री.मुदस्सर भाई बोला.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सध्या भुयारी गटरचे काम चालू असून त्यामुळे शहरामध्ये खड्डे झाले आहेत.केलेल्या खड्यांवर मुरूम टाकणे,पॅचिंग करण्याचे काम या ठेकेदाराने केले पाहिजे.या बाबत रोज वर्तमान पत्रामध्ये बातम्या येत आहे.

मा.सभापती साहेब :- पुढील विषय पॅचिंगचा आहे.यामध्ये आपण या विषयावर बोलू.या विषयाबाबत या ठेकेदार संस्थेने निविदा रकमेपेक्षा कमी दराने निविदा भरलेली आहे.त्यामुळे कामाचा दर्जा चांगला असेल का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- आपण एस्टीमेंट केल्यानंतर कोणी किती दराने निविदा भरायची हा त्यांचा प्रश्न आहे.कोणी कमी दराने निविदा भरल्यानंतर आपण कामाची गुणवत्ता राखण्यासाठी आपण त्यांच्याकडून जादा सेक्युरेटी डीपॉझीट घेतो.

मा.सभापती साहेब :- यापुर्वी ज्या ठेकेदारांनी निविदा दरापेक्षा कमी दराने निविदा भरल्या त्यांचा आपल्याला काम अनुभव आहे.त्यांच्या कामाचा दर्जा कसा आहे?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- सध्याअशी कामे चालू आहेत.कामाच्या दर्जामध्ये कोणतीही तडजोड होत नाही.

मा.सभापती साहेब :- अशा ठकेदारांनी काम मध्येच बंदकेले आहे का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- नाही,काम गुणवत्तेमध्ये झाले नाही तर आपण त्यांचे दोन्ही डीपॉझीट ठेवून घेतो.

मा.सभापती साहेब :- जर,तर नाही,असे काही अनुभव आहे का? काम त्यांना परवडले नाही म्हणून त्यांनी काम बंद केले असे काही आहे का?

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- नाही.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितेतर सुधार योजना सन-२०२०-२०२१ अंतर्गत प्रभाग क्र.६ मधील वैदुवाडी चौक,शुभ मंगल कार्यालय पर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत ई-निविदा क्र. ६७६४८२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितेतर सुधार योजना सन-२०२०-२०२१ अंतर्गत ई-निविदा क्र. ६७६४८२ अंतर्गत प्रभाग क्र.६ मधील वैदुवाडी चौक,शुभ मंगल कार्यालय पर्यत गटर व रस्ता विकसित करणे बाबत निविदाधारक अभिजीत काळे,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा १०.५१% कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाबाई शिंदे सही/-

अनमोदक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभपती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६४** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर (प्रभाग क्रमांक १ ते ८) मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

कामाचे नाव- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे (प्रभाग क्र. १ ते ८ अंतर्गत )

१.) उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, सध्या शहरामध्ये मोठया प्रमाणात पाउस झाल्यामुळे रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेली आहेत. शहरात येणरे प्रमुख रस्ते हे सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. परंतु पाणी पुरवठा विभागाने फेज-२ योजनेची पाईप टाकणेची खोदाई मुळे बहुतांशी रस्ते नादुरुस्त असून त्यांचे निविदेत रस्ता सुस्थितीत करुन देणे असे असतांना सुस्थितीत करुन दिलेली नाही. त्याच प्रमाणे दरवर्षापेक्षा पावसाचे प्रमाण जादा होण्याची शक्यता असल्यामुळे रस्ते खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यानुसार नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे./ ब

२) सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक - "रस्ते दुरुस्ती" २०२१-२२ रजि.नं. पान नं. २०१ अ.नं. १

| | | |
|---|---|---|
| तरतुद | :- | रु. १,७५,००,०००/- |
| यापूर्वीचा खर्च | :- | रु. निरंक |
| प्रस्तावित खर्च | :- | रु. ४९,८०,००४/- |
| एकूण खर्च | :- | रु. ४९,८०,००४/- |
| शिल्लक | :- | रू. १,२५,१९,९९६/- |

४) कामाची निकड :- सदर भागामध्ये समक्ष पाहणीकेली असता सद्यपरिस्थितीमध्ये सध्या शहरामध्ये मोठया प्रमाणात पाउस झाल्यामुळे, रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेली आहेत. त्यानुसार नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

५)कामाचा वाव :- ३७०० स्वेअर मीटर रस्त्याचे खड्डे बुजविणे.

६) दरसुची :- एम जे पी / सा. बा. वि. २०१९-२० डी एस आर नुसार

७) प्रस्तावित कामाची आवश्यक मागणी :- सद्दस्थितीमध्ये सदर भागात मोठया प्रमाणात खड्डे पडलेली असल्यामुळे नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम रुपये रु. ४९,८०,००४/- चे कामास व खर्चास सन २०२१-२२ मधील "रस्ते दुरूस्ती व पॅचींग करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास रिपोर्ट सविनय सादर./ अ

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरिल अ प्रमाणे कार्यवाहीस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१] प्रस्तावित खर्च संबंधित योजने कडून वसूल करणे आवश्यक असल्याने ब बाबत पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे निर्देशनास आणून देणे संयुक्तिक होईल. २] डी.एस.आर. सन २०१९-२० बाबत विभागाने खात्री करून प्रस्तावीत अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सादर, पाणी पुरवठा फेज-२ या कामाच्या योजनेमध्ये रस्ते दुरुस्ती बाबतचे अंदाजपत्रकामध्ये बाबी अंतभुत नाही. त्यामुळे रस्ते दुरुस्ती संबंधित योजनेमार्फत करणे संयुक्तीक नाही. मान्यतेस्त सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मा.स्थायी समिती मंजुरीस ठेवण्यास मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर ( प्रभाग क्रमांक १ ते८ )मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सध्या शहरामध्ये भुयारी गटर योजनेचे काम चालू आहे.ज्या ठिकाणी ठेकेदार लाईन टाकत आहे.ज्याठिकाणी डांबरीरोड असेल किंवा कॉक्रीटीकरण असेल,तर त्या ठिकाणी ठेकेदाराने पॅच करणे बंधनकारक आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- हो बंधनकारक आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- माझ्या प्रभागामध्ये कराचीवाला नगरमध्ये भुयारी गटर योजने मध्ये लाईन टाकण्यात आलेली आहे.त्याठिकाणी मोठया प्रमाणामध्ये खड्डे झालेले आहेत.पावसामुळे चिखल झालेला आहे.ठेकेदाराला फोन केला असता त्याठेकेदारने काम सब कॉन्ट्रॅक्टरला दिले आहे.स्वत:ठेकेदार काम करीत नाही.नागरीकांचे मोठया प्रमाणावर आम्हाला फोन येतात.ठेकेदाराने अजपर्यत कोणताही डांबरी ,अथवा कॉक्रीटीकरणाचा पॅच केलेला नाही.मी ठेकेदाराला बोलल्यानंतर त्यांनी एका ठिकाणी मुरूमाची गाडी आणून टाकली.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- सध्या पावसाळा असल्यामुळे डांबरीकरण करता येत नाही.सध्या त्यांना WBM करण्याचे आदेश दिले आहेत. WBM करायला सांगतो.

मा.सभापती साहेब :- ब-याच नगरसेवकांचा हा विषय आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ब-याच नगरसेवकांना माहित नाही की,ठेकेदाराने रस्ता फोडल्यानंतर पुन्हा डांबरीकरण किंवा कॉक्रीटीकरण करून देणे बंधनकारक आहे.

मा.सभापती साहेब :-ज्या ठिकाणी WBM असेल त्यां ठिकाणी WBMज्या ठिकाणी डांबरीकरण असेल त्या ठिकाणी BBMकरायचे किंवा ज्या ठिकाणी कॉक्रीटीकरण असलेल्या त्या ठिकाणी कॉक्रीटीकरण करणे ठेकेदाराला बंधनकारक आहे.त्यांच्या अटी व शर्ती मध्ये आहे.पण असे होत नाही.माझ्या प्रभागामध्ये काही ठिकाणी केले आहे.परंतु ब-याच ठिकाणी केलेले नाही.ठेकेदाराकडे परप्रांतीय कामगार आहेत.ते आजुन आलेले नाही.आपल्याला त्याच्याशी काही घेणे देणे नाही.आपण इतकी मोठी योजना,इतके मोठे टेंडर आपण त्याला दिलेले आहे.काम करण्याची जबाबदारी ही त्याची आहे.त्याला कामगारं मिळाले नाही म्हणून आपण काय करणार.त्याला आपण काम दिले आहे.आपण त्याला पैसे देणार आहे.त्यांनी शहराच्या रस्त्याची चाळण करून ठेवली आहे. मी कामांची यादी मागवून घेतली आहे. बहुतांश रस्ते

मंजूर आहेत.परंतु या अमृत च्या कामामुळे रत्याच्या खालचे काम झाल्यामुळे रस्तेसुध्दा करता येत नाहीत.ही वस्तुस्थीती आहे की,नाही हे सांगा.यामुळे शहराचे नांव खराब होत आहे.महासभेमध्ये सुध्दा हा विषय झालेला आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ठेकेदार,पी.एस.सी.यांची संयुक्त बैठक लावतो.आपण सध्या WBM चे कामे त्यांच्या कडून करून घेवू.मा.सभापती साहेब यांची वेळ घेवून बैठक बोलावतो.

मा.सभापती साहेब :- विषय गांभीर्याने घ्या,ठेकेदाराला बोलावून घ्या,ठेकेदार उडवाउडवीची उत्तरे देत आहे.पेमेंटघ्यायचे असेल तर पालीकेमध्ये येतो.तुम्ही सुध्दा जेव्हा जेव्हा बोलावता त्यावेळी तो येत नाही.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ठेकेदाराला उपस्थीत राहणे बाबत आदेश काढतो.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराचे प्रतिनिधी बोलावण्या पेक्षा,समक्ष ठेकेदारास बोलवा.ठेका घेतात व सब ठेकेदार नेमतात.शहराचे वाटोळे झाले तरी त्यांना काही घेणे देण नाही.नागरीकांना आम्हाला तोंड दयावे लागते.प्रशासनाला सुध्दा तोंड दयावे लावते.शहराबद्दल आपल्या सर्वाना काही तरी आत्मीयता पाहिजे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ठेकेदाराकडून किती टक्के काम झाले आहे.नेमकी कामाची काय स्थीती आहे.या बाबत आम्हाला माहिती सांगा.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार आपल्याला कारणे सांगत आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- मा.आमदार साहेबांच्या पाठपुराव्यामुळे शहरातील रस्ते मंजूर आहेत.तुमच्या या गहाळ कामामुळे ते रस्ते सुध्दा करता येत नाहीत व लोकप्रतीनिधींना नागरीकांच्या टिकेला तोंड दयावे लागते.हे सर्व अमृत योजनेमुळे झालेले आहे.किती दिवसांमध्ये काम होणार आहे.तुम्ही सांगीतले होते त्यांना नोटीस काढणार आहे.नोटीस काढली कि नाही या बाबत माहिती दया.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- आपण नोटीस काढली आहे.बैठक सुध्दा लावणार आहे.त्यांना सुचना देण्यात आलेल्य आहेत की,सध्या रस्ते खोदाई करू नका.आहे ते रस्ते पॉचिंग करा.सारसनगर भागातील काही कामे झालेली आहेत.अडचणींची कामे केली आहे.इतर खोदाईचे कामे बंद केली आहे.मा.आयुक्त साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग घेतो.पी.एम.सी.ला सुध्दा उपस्थीत ठेवतो.

मा.सभापती साहेब :- श्री.भुसारे या बाबत खास मिटींग लावा.या बैठकीला मा.आयुक्त साहेब,उपायुक्त साहेब यांना सुध्दा बैठकीला उपस्थीती बाबत कळवा.शहरातील कोणकोणते रस्ते मंजूर आहे याची माहिती घ्या.शहर अभियंता यांनी माहिती दयावी.सध्या पावसाळा चालू आहे.नविन खोदकाम बंद ठेवा.ठेकेदाराने त्याने त्याचे काम करून दयावे.मला खुलासा करा कि,ज्या ठिकाणी काम मंजूर आहे.जो ठेकेदार असतो तो म्हणतो की,तुम्ही मला खालचे काम चालू करून दया,मग मी काम करतो.आपण प्रशासनाने त्यावर काय भुमीका घेतलेली आहे.काय ठरले ते सांगा.मोघम सांगू नका.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- नियमाप्रमाणे ड्रीम कंन्ट्रक्शन ने काम घेतलेले आहे.त्यानुसार त्यांनी आपल्याला काम करून दयावे.तो जर असे म्हणत असेल,जर बांधकाम विभागाकडील ठेकेदाराने जर काम केले असेल,त्याचे पैसे ठेकेदाराने दिले तरी आपली अडचण नाही.

मा.सभापती साहेब :- तुमची भुमीका काय आहे ते स्पष्ट करा.जर तर सांगु नका.काय निर्णय आहे तो सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- हा निर्णय आपण मा.आयुक्त साहेबांच्या मिटींगमध्ये घेवू.

मा.सभापती साहेब :- म्हणजे निर्णय झालेला नाही.

मा.श्री.मुदस्सर शेख :- किती टक्के काम झाले आहे.भुयारी गटर योजनेचे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ८५ टक्यावर काम झाले आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ४० सावेडी गटर योजने साठी ४० टक्के काम पुर्ण असल्याबाबत एन.ओ.सी.लागत होती.सावेडी भुयारी गटर योजनेसाठीच्या प्रस्ताव दयायचा होता.सावेडी भुयारी गटर संदर्भात काही नविन प्रस्ताव पाठविला आहे का.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- एम.जी.पी. काम करीता आहे.पी.एम.सी.म्हणून या बाबत वर्क आउट चालू आहे.अदयाप प्रस्ताव पाठविलेला नाही.

मा.सभापती साहेबः- याबाबत मी मा.आयुक्त साहेब,सन्मानीय आमदार मा.संग्रामभैय्या जगताप सर्व पदाधिकारी असतील आपण त्याचा पाठपुरावा केला आहे.महत्वाची योजना आहे ही.यामध्ये मुकुंदनगर,बोल्हेगांव ,केडगांव सावेडी,सर्व उपनगरे आहेत.या बाबत आम्ही मा.महापौर वाकळे साहेब ,विद्यमान महापौर शेंडगेताई यांचे समावेत मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांच्या उपस्थितीमध्ये बैठका पार पडल्या आहेत.या करीता आपल्याला सर्वचे सहकार्य लाभले आहे.लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार आहे.या बाबत पाठपुरावा चालू आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सावेडी भुयारी गटर योजनेचा पाठपुरावा करण्या करीता उच्च दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- आपण लवकरच मिटींग घेणार आहे.त्यावेळी अधिका-याची नियुक्ती करण्यात येईल.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- उपनगराच्या भुयारी गटर त्यामध्ये सर्व उपनगराच्या दृष्टीने भुयारी गटर होणे आवश्यक आहे.सावेडी भागाकरीता सुध्दा भुयारी गटर होणे आवश्यक आहे.या योजनेच्या पाठपुराव्याकरीता समिती स्थापन करता येईल का.

मा.सभापती साहेब :- हो करता येईल.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- भुयारी गटर योजने करीता समिती स्थापन केली तर समितीच्या बैठका घेवून सदर प्रश्न लवकर मार्गी लागेल.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- आपली परवाच बैठक झाली मा.महापौर ,मा.उपमहापौर,सभापती या बैठकीस उपस्थित होते.एम.जी.पी.च्या अधिका-यांना बोलाविले होते.आपण्या त्यांच्या कडून लिहून घेतो की,आम्ही डी.पी.आर.तयार करू शकत नाही.तुम्ही खाजगी एजन्सी कडून तयार करून घ्या.ते आल्यानंतर आपण डि.पी.आर. करून घेवू व मा.शासनाकडे सादर करू.

मा.श्री.सागर बोरूडे :- श्री.इथापे साहेब आपण मला सांगा की,आपण पॅचिंग नेमके कसे करणार.आपण पावसाळा आला की,आपण पॅचिंग करतो.पावसानु पुन्हा खड्डे पडतात.यामध्ये काहीतरी सिस्टम पाहिजे.म्हणजे वारंवार खड्डे पडणार नाही.पाईपलाईन रोड वरील यशोदानगर कमानी जवळ मोठे खड्डे पडले होते.अत्तापर्यत दोन तीन वेळा पॅचिंग केले.तरी वरंवार खड्डे पडत राहतात.प्रत्येक वेळी खडी ,मुरूम टाकण्यापेक्षा काहीतरी कायमस्वरूपी उपाययोजना केली तर बरे होईल.पुन्हा पुन्हा तेच ते खड्डे व पुन्हा पॅचिंग करावे लागते.या बाबत माहिती दया.

मा.सभापती साहेब :- पॅचिंगचा दर्जा चांगला होईल या दृष्टीने उपाययोजना आहेत या बाबत माहिती दया.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- मागील वर्षी आपण रस्ते पॅचिंग करीता निविदा प्रसिध्द केली होती.परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.ज्यांनी निविदा भरल्या त्या तीस ते चाळीस टक्के जादा दराने निविदा भरल्या होत्या.करण पॅचिंगचे काम करीत असतांना तांत्रिक अडचणी ब-याच येत असतात.कामाच्या मोजमापानुसार होणारे बील,यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे काम करीता नाही.तरीही आम्ही प्रयत्न करून,मा.उपायुक्त साहेब यांचेशी चर्चा करून,निविदा दराने ती कामे करायला लावले.गेल्या वर्षी जी कामे केली त्यामध्ये आम्ही काही बदल केले.काम करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा केल्या आहेत.जीथे मागच्या वर्षी पॅचिंग केले आहे.ते चांगल्या स्थिती मध्ये आहे.मागच्या वर्षी् प्रचंड पाउस झाला तरी ते

पॅचिंग टिकलेले आहे.यशोदानगर कमानीजवळील रस्ता सखल भागामध्ये होता.त्याठिकाणी मोठे पिस केले ते आजही सुस्थितीमध्ये आहेत.परंतु काही भागातील रस्त्यांचे नुतनीकरण झालेले नाही.रस्त्यावर अनेक प्रकारची कामे होतात.पाणी पुरवठा,ड्रेनेज ईलन,टेलीफोन विभागाची कामे,केबल्स आहेत वेगवेगळया प्रकारची देखभाल दुरूस्तीची कामे होतात.शहराच्या पश्चिम भागामध्ये अमृतभुयारी गटर योजना तसेच पाणी पुरवठा योजना यांच्या कामामुळे रस्ते खोदले आहेत.रस्ता खोदल्याचा भाग जरी थोडा असला तरी त्याच्या आजुबाजुचा भाग तो कमकुवत करतो.त्यामुळे रस्ता टिकत नाही.रस्ता खचतो व खराब होतो.पॅचिंग कामाचे आयुष्य फार कमी असते.ती तात्पुरती मलमपट्टी असते.तरी सुध्दा ते चांगल्या दर्जाचे होण्याचे प्रयत्न करीता आहोत.या वर्षी आपण गेल्या पंधरा दिवसांपासून पाउस चालू आहे.प्रमुख रस्त्यांवरील मोठे खड्डे बी.बी.एम.टाकले आहे.सभेमध्ये दोन निविदा मंजुरी करीता ठेवण्यात आलेल्या आहेत.पावसाळा संपल्यानंतर किंवा पाउस कमी झाल्यानेतर पॅचिंगची कामे आपण प्रधान्याने हाती घेणार आहोत.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- भिस्तबाग चौकामध्ये मोठा खड्डा पडलेला आहे.त्याठिकाणी कायम अपघात होत आहेत.पावसाच्या पाण्यामध्ये हा खड्डा दिसत नाही.विषयमध्ये आपण प्रभाग क्रमांक दिले आहेत.प्रभागातील बॉर्डर वरील कामे होतील परंतु प्रभागातील अंतर्गत रस्त्यांचे पॅचिग नगरसेवकांना विचारून केले पाहीजे.प्रभागातील नगारीक आम्हाला तक्रार करतात.पॅचींग करण्या साठी पाठपुरावा करण्यातची गरज पडू नये असे मला वाटते.श्री.इथापे साहेब या बाबत सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- यामध्ये आपण प्रमुख वर्दळीचे रस्ते आहेत.ज्या रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतुक होते.दळणवळण होते.त्यामुळे नागरीकांचा त्रास कमी व्हावा या दृष्टीकोनातुन आपण मोठे रस्ते प्राधान्याने घेतो.त्यानंतर आपण त्यांना जोडणारे सेकंडरी जे रस्ते आहेत ते घेतो.शहरामध्ये या कामांमुळे बहुतांशी रस्ते खराब झालेले आहेत.सर्व शहरातील अंतर्गत रस्ते पॅचिंग करू शकत नाही.पॅचिंग च्या कामामध्ये आमचे समाधान होत नाही.पॅचिंगच्या कामाला ताकत नसते.त्याला पाहिजे तेव्हढे आयुष्यमान मिळत नाही.आमची आपणा सर्वाना विंनती आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- प्रभागातील सर्व रस्त्यांचे पॅचिंग करा असे आमचे म्हणणे नाही.ज्या ठिकाणी मोठे खड्डे आहेत.नागरीकांना ये जा करण्यास त्रास होतो.ज्या ठिकाणी अपघात होतात.ते रस्ते तर घेतले पाहिजेत.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- प्रमुख चौक ,प्रमुख रस्ते आपण प्राधान्याने घेणार आहोत.नागरीकांचा त्रास कसा कमी होणार हे आपण पहाणार आहोत.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- प्रभागातील रस्त्यावर टाकण्याकरीता मुरूम मिळत नाही.आपण मा.आयुक्त साहेबांबरोबर व्हिजीट दिली आहे.आपण परिस्थीती पाहिली आहे.नागरीकांना चालणे सुध्दा अशक्य झ ाले आहे.आपण यावर काही उपाययोजना करावी.मुरूम टाकणे बाबत कार्यवाही करावी हि विंनती.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- ज्या ठिकाणी तातडीची गरज आहे त्या ठिकाणी मुरूम टाकणे बाबत स्टोअर विभागास प्रस्ताव देवू.तातडीने व्यवस्था करू.

मा.सभापती साहेब :- रामचंद्र खुंट ते हातमपुराचौक हा रस्ता खुप खराब झालेला आहे.हा रस्ता करण्याकरीता मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.किमान रू.एक ते दिड कोटी पेक्षा जास्त निधी लागणार आहे.आपण मा.शासनाच्या मार्फत मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्फत तसा प्रयत्न करीत आहोत.परंतु जोपर्यत निधी प्राप्त होणार नाही तो पर्यत हा रस्ता करता येणार नाही.शहरातील सर्वात खराब हा रस्ता झालेला आहे.शहरातील बाकीचे रस्ते मंजूर आहेत.या भागामध्ये मार्केट असल्याने मोठया प्रमाणात वर्दळ आहे.या भागामध्ये पॅचिंग करावे लागणार आहे.या बाबत आपण निर्णय दयावा.हा रस्ता करणे करीता काहीतरी डागडूजी करावीच लागणार आहे.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- या रस्त्याची दुरावस्था झाली आहे ही वस्तुस्थीती आहे.हा भाग सखल आहे.आजुबाजुच्या नागरीकांचे पाणी रस्त्यावर येवून हा रस्ता आणखी खराब झालेला आहे.या रस्त्याचा संपुर्ण पृष्ठभाग पाहिला तर तो दुरूस्त करण्यायोग्य नाही.संपुर्ण रस्ता खराब झालेला आहे.या ठिकाणी नविन रस्ता करण्याशिवाय पर्याय नाही परंतु या भागामध्ये पहाणी करतो.आणि जरूर ती उपाययोजना करतो.नविन रस्ता करणे हाच उपाय आहे.मी आपणास विनंती करतो की,या करीता आपण निधी उपलब्ध केला तर रस्ता करता येईल.सध्या काय डागडूजी करता येईल ते पहाणी करून सांगतो.

मा.सभापती साहेब :- निधी करीता आम्ही सुध्दा प्रयत्न करत आहोत.कारण तो महत्वाचा रस्ता आहे.या रस्त्या करीता निधी प्राप्त करण्यात करीता प्रयत्न करीत आहोत.परंतु सध्या कोरोनाचा काळ असल्याने निधी येण्याकरीता किती वेळ लागेल हे सांगता येत नाही.परंतु तोपर्यत रस्त्याची डागडूजी करणे आवश्यक आहे.येथील नागरीकांचा त्रास कसा कमी होईल याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा.अमृत भुयारी गटरची कामे झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने करारनाम्यात नमुद प्रमाणे पॅचिंगची कामे करून दिलेली नसल्याने अशा ठिकाणांची यादी तयार करून त्याचे अंदाजपत्रक करून. सदर पॅचिंगचे काम विषयांकित कामासाठी अंतिम होणा-या निविदाधारकाकडून करून घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.सदर केलेल्या कामांची देयके पाणी पुरवठा विभागाने तयार करावीत.या कामाचा खर्च या लेखाशिर्षकातुन करण्यात यावा.

या बाबत पाणी पुरवठा विभागाने प्राधान्याने कार्यवाही करावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर प्रभाग क्रमांक १ ते८ मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर प्रभाग क्रमांक १ ते ८ मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :-डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६५** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर ( प्रभाग क्रमांक ९ ते १७ )मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

कामाचे नाव- अहमदनगर मनपा हद्दीतील शहर व उपनगर मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे- (प्रभाग क्र. ९ ते १७ अंतर्गत )

१.) उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, सध्या शहरामध्ये मोठया प्रमाणात पाउस झाल्यामुळे रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेली आहेत. शहरात येणारे प्रमुख रस्ते हे सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. परंतु पाणी पुरवठा विभागाने फेज-२ योजनेची पाईप टाकणेची खोदाई मुळे बहुतांशी रस्ते नादुरुस्त असून त्यांचे निविदेत रस्ता सुस्थितीत करुन देणे असे असतांना सुस्थितीत करुन दिलेली नाही. त्याच प्रमाणे दरवर्षापेक्षा पावसाचे प्रमाण जादा होण्याची शक्यता असल्यामुळे रस्ते खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यानुसार नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे./ ब

२) सदर कामाची अंदाजपत्रकीय तरतुद खालील प्रमाणे आहे.

लेखाशिर्षक - "रस्ते दुरुस्ती" २०२१-२२ रजि.नं. पान नं. २०१ अ.नं. २

| | |
|---|---|
| तरतुद | :- रु. १,७५,००,०००/- |
| यापूर्वीचा खर्च | :- रु.४९,८०,००४/- |
| प्रस्तावित खर्च | :- रु. ४९,८९,९७४/- |
| एकूण खर्च | :- रु. ९९,६९,९७८/- |
| शिल्लक | :- रू. ७५,३०,०२२/- |

४) कामाची निकड :- सदर भागामध्ये समक्ष पाहणीकेली असता सद्यपरिस्थितीमध्ये सध्या शहरामध्ये मोठया प्रमाणात पाउस झाल्यामुळे, रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे पडलेली आहेत. त्यानुसार नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

५)कामाचा वाव :- ३७१० स्वेअर मीटर रस्त्याचे खड्डे बुजविणे.

६) दरसुची :- एम जे पी / सा. बा. वि. २०१९-२० डी एस आर नुसार

७) प्रस्तावित कामाची आवश्यक मागणी :- सद्दस्थितीमध्ये सदर भागात मोठया प्रमाणात खड्डे पडलेली असल्यामुळे नागरिकांच्या सोईसाठी विषयांकीत काम करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम रुपये रु. ४९,८९,९७४/- चे कामास व खर्चास सन २०२१-२२ मधील "रस्ते दुरूस्ती व पॅचींग करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास रिपोर्ट सविनय सादर./ अ

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरिल अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१] प्रस्तावित खर्च संबंधित योजने कडून वसूल करणे आवश्यक असल्याने ब बाबत पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे निर्देशनास आणून देणे संयुक्तिक होईल. २] डी.एस.आर. सन २०१९-२० बाबत विभागाने खात्री करून प्रस्तावीत अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सादर, पाणी पुरवठा फेज-२ या कामाच्या योजनेमध्ये रस्ते दुरुस्ती बाबतचे अंदाजपत्रकामध्ये बाबी अंतभुत नसल्याने संबंधीत योजना अंतर्गत रस्ते दुरूस्ती करणे संयुक्तीक नाही. मान्येतेस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवल्यास मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-** विषय क्रमांक ६४ प्रमाणे चर्चेनुसार

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- आफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर प्रभाग क्रमांक ९ ते १७ मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर प्रभाग क्रमांक ९ ते १७ मधील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मार्ग रस्त्याचे पॅचिंग करणे करिता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :-डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०५**
**(ऑनलाईन झुम अॅप व्दारे)**

**विषय क्रमांक- ६६** **सोमवार दि.२६/०७/२०२१**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

संदर्भ :- ई-निविदा क्र.२०२१_ANMC_६८८०७२_१

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभागा करिता सन.२०२१-२०२२ या आर्थिक वर्षा करिता शहरातील व उपनगरातील दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी आवश्यक असणा-या विद्युत साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरी करिता मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांकः भांखस - २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन दै.पुण्य नगरी दि.२२/०५/२०२१ व दै.सार्वमत दि.२३/०५/२०२१ चे वर्तमानपत्रात संक्षिप्त जाहिरात तसेच **http://maharashtra. gov.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)लक्ष्मी एंटरप्राईजेस,नाशिक
२)अर्हम एंटरप्राईज,मुंबई
३)एच.व्ही.एंटरप्राईजेस,मुंबई
४)जय इंम्पेक्स,मुंबई

याप्रमाणे चार (४) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त प्राप्त चार निविदांपैकी लक्ष्मी एंटरप्राईजेस,नाशिक या निविदेतील तांत्रिक लिफाफ्यातील अत्यावश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने सदरची निविदा अग्राहय असल्याने सदर निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आलेला नाही.उर्वरित तीन ग्राहय निविदांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले असून ग्राहय निविदादरांचा तुलनात्मक तक्ता पाहता

अ.नं.९३ ब व ९९ चे दर एकाही निविदाकाराने दिलेले नाहीत

अ.नं.१ ते ९३,९४ ते ९८ व १०० ते १०९ चे निविदा दर अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत.

मा.विद्युत विभाग प्रमुख यांचेकडून अ.नं.- १ ते १०९ चे साहित्याचे सन.२०२०-२०२१ करिताचे उपलब्ध PWD (विद्युत) मंजूर DSR दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्तयात कॉलम क्र.४ मध्ये व बाजारातील प्रचलित दर कॉलम क्र.५ मध्ये नमुद करुन घेवून निविदेमध्ये प्राप्त स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दराची सन.२०२०-२०२१ चे मंजूर DSR दराशी तुलना करता व सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता -

अ.नं.१ ते १०९ पैकी - अ.नं.१,४ ते ५,७,९ ते १४,१६ ते ३०,३३ ते ३५,४१,४१ अ,४१ ब,४४ ते ४५,५८ ते ५९,६१ अ,६३ ते ७१,७२ अ,७३ अ,७४ ते ८४,८६ ते ९०,९३,१०१,१०६ व १०८ ते १०९ चे DSR दर उपलब्ध आहेत.

व अ.नं.- २ ते ३,६,८,१५,३१ ते ३२,३६ ते ३७,४२ अ,४३,४६ ते ५७,६० ते ६१,६२,६२ अ,७२ ,७३,८५,९१ ते ९२,९३ अ,९३ ब,९४ ते १००,१०२ ते १०५,१०७ व १०७ अ चे DSR दर उपलब्ध नाहीत.

उपलब्ध मंजूर DSR दराशी निविदेतील प्राप्त स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दराची तुलना करता - अ.नं.- ४ ते ५,७,९ ते १३,१६ ते १८,२०,२२,२८,३३ ते ३४,३९,४१,५८,६३ ते ६५,७४ ते ८४,८६,९३,१०६ व १०८ चे दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

व अ.नं.- १,१४,१९,२१,२३ ते २७,२९ ते ३०,३५,३८,४० ,४१ अ,४१ ब,४४ ते ४५,५९,६१ अ,६६ ते ७१,७२ अ,७३ अ,८७ ते ९०,१०१ व १०९ चे दर DSR दरापेक्षा जास्त आहेत

प्राप्त निविदांपैकी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर असणारे निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांना दर निगोसिएशन करिता उपस्थित राहणेबाबत कळवून गुरुवार दि.१/०७/२०२१ रोजी सकाळी ११=०० वा. झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीमध्ये सदरचे संपूर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा दर वाटाघाटीबाबत निर्णयास्तव ठेवले असता दर निगोसिएशन करिता स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर असणारे निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई हे समक्ष उपस्थित होते दर निगोसिएशनबाबत बैठकीमध्ये सांगोपांग चर्चा होवून निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांनी दर निगोसिएशन बैठकीतील चर्चेनुसार खालील तक्यात कॉलम क्र.४मध्ये नमुद केल्याप्रमाणे दर दिलेले असून तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.पूररवठादार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेले दर सन२०२०-२०२१चे PWD(विद्युत) मंजूर DSR दरापेक्षा कमी व बाजारातील दराशी मिळते जुळते असल्याने निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांनी दर निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेल्या खालील तक्त्यात कॉलम क्र.४मध्ये नमुद दरास मंजुरी देणेबाबत तसेच दर प्राप्त न झालेल्या अ.क्र.९३ ब व ९९चे साहित्याचे खरेदी मा.महाराष्ट्र शासन निर्णय उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.-भांखस-२०१४/प्र.क्र.८२भाग II/उदयोग-४दि.१/१२/२०१६अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिकेतील निर्देशानुसार विहित कार्यपध्दीतीचा अवलंब करुन करणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

मा.प्रशासकिय खरेदी समितीने मंजुरी करिता शिफारस केलेले दर (कॉलम क्र.४ मध्ये नमुद) सर्व करासह व साहित्य स्टोअर पोहोच पूरवठा करणेसहचे आहेत.

| **निविदेतील I अ.क्र.** | **विद्युत साहित्याचा तपशिल** | **निविदेमध्ये दिलेला दर** | **मा.प्रशासकिय खरेदी समितीने वाटाघाटीनंतर मंजुरी करिता शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | ४ फूट ३६ वॅट टयुब बार<br>क्रॉम्प्टन | ४५=००<br>प्रती १ नग | ४३=००<br>प्रती १ नग |
| २ | टयुब लॉक होल्डर (ब्रॉस कॉन्टॅक्ट) | ११=००<br>प्रती १ नग | १०=००<br>प्रती १ नग |
| ३ | लाकडी बोर्ड ८ x १०<br>Sunmica folding board | २२५=००<br>प्रती १ नग | २१०=००<br>प्रती १ नग |
| ४ | २४ वॅट इलेक्ट्रॉनिक्स T- ५ चोक<br>क्रॉम्प्टन / फिलीप्स | २३०=००<br>प्रती १ नग | २१०=००<br>प्रती १ नग |
| ५ | ३६ वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक<br>क्रॉम्प्टन / फिलीप्स | २२३=००<br>प्रती १ नग | १६५=००<br>प्रती १ नग |
| ६ | ३६ वॅट पी.एल टयुबा (स्ट्रीट लाईट)<br>क्रॉम्प्टन / फिलीप्स | १६५=००<br>प्रती १ नग | १३५=००<br>प्रती १ नग |
| ७ | २४ वॅट पी.एल टयुबा (T- ५ टयुब)<br>क्रॉम्प्टन | १२२=००<br>प्रती १ नग | १२०=००<br>प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | हाय टेंशन ब्लॅक टेप<br>19 mm x 30 ft.<br>3 m Scatch 23 HT | ६४७=०० प्रती १ नग | ६२०=०० प्रती १ नग |
| ९ | १५० वॅट सोडिअम बल्ब<br>क्रॉम्प्टन | ३२५=०० प्रती १ नग | ३२०=०० प्रती १ नग |
| १० | १५० वॅट सोडिअम चोक<br>क्रॉम्प्टन | १,२८५=०० प्रती १ नग | १,१८५=०० प्रती १ नग |
| ११ | १५० वॅट सोडिअम इग्नेटर<br>क्रॉम्प्टन | १८५=०० प्रती १ नग | १७५=०० प्रती १ नग |
| १२ | १५० वॅट थ्रेड टाईप मर्क्युरी होल्डर<br>क्रॉम्प्टन | ९५=०० प्रती १ नग | ९०=०० प्रती १ नग |
| १३ | सिलींग फॅन ४८ " संपूर्ण ॲसेसरीजसह<br>W/O Regulater<br>क्रॉम्प्टन / पॉलिकॅब | २,०००=००<br>२,१००=००<br>प्रती १ नग | १,६००=०० प्रती १ नग |
| १४ | पेडस्टल फॅन १६"<br>क्रॉम्प्टन | २,९५०=०० प्रती १ नग | २,३२५=०० प्रती १ नग |
| १५ | जी आय तार नं.१४ | १२२=०० प्रती १ किलो | १२०=०० प्रती १ किलो |
| १६ | फायबर डयुम हंडी १२" फायबर प्लास्ट | १,०००=०० प्रती १ नग | ५६०=०० प्रती १ नग |
| १७ | बेल पुश विथ बटन Modular<br>ग्रेटव्हाईट | ११५=०० प्रती १ नग | ११०=०० प्रती १ नग |
| १८ | लोखंडी ब्रॅकेट बी ग्रेड जी आय पाईप साईज ३ फूट ४० एमएम | ५००=०० प्रती १ नग | ४५०=०० प्रती १ नग |
| १९ | लोखंडी क्लॅम्प ५" x ३" नटबोल्टसह | २६७=०० प्रती १ जोड | २२५=०० प्रती १ जोड |
| २० | २.५ एम एम २ कोअर सर्विस वायर<br>आय.एस.आय.मार्क १०० मीटर x १ बंडल | १,८००=०० प्रती १ बंडल | १,३५०=०० प्रती १ बंडल |
| २१ | ४ sq mm २ कोअर पी व्ही सी कॉपर केबल<br>आय.एस.आय.मार्क | १६०=०० प्रती १ मीटर | ७०=०० प्रती १ मीटर |
| २२ | १० sq mm ४ कोअर पी व्ही सी<br>ॲल्युमिनिअम आर्मड केबल<br>आय.एस.आय.मार्क | १५०=०० प्रती १ मीटर | १३५=०० प्रती १ मीटर |
| २३ | २५ sq mm ४ कोअर पी व्ही सी ॲल्युमिनिअम आर्मड केबल<br>आय.एस.आय.मार्क | २३५=०० प्रती १ मीटर | २००=०० प्रती १ मीटर |
| २४ | ५० sq mm ४ कोअर पी व्ही सी ॲल्युमिनिअम आर्मड केबल<br>आय.एस.आय.मार्क | ४७५=०० प्रती १ मीटर | ३२५=०० प्रती १ मीटर |
| २५ | ७० sq mm ४ कोअर पी व्ही सी ॲल्युमिनिअम आर्मड केबल<br>आय.एस.आय.मार्क | ५८३=०० प्रती १ मीटर | ४९०=०० प्रती १ मीटर |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | ४ स्क्वेअर एम एम x ३ कोअर कॉपर सबमर्शिबल केबल आय.एस.आय.मार्क | १७४ =०० प्रती १ मीटर | १५० =०० प्रती १ मीटर |
| २७ | ६३ AMP थ्री फेज मेन स्वीच | ३,६००=०० प्रती १ नग | २,९०७=०० प्रती १ नग |
| २८ | १०० AMP थ्री फेज मेन स्वीच | ५,६००=०० प्रती १ नग | ५२००=०० प्रती १ नग |
| २९ | २०० AMP थ्री फेज मेन स्वीच | ९,३००=०० प्रती १ नग | ७,०५५=०० प्रती १ नग |
| ३० | वॉल फॅन १६" संपुर्ण असेसरीजसह - क्रॉम्प्टन | २,६५०=०० प्रती १ नग | २,२००=०० प्रती १ नग |
| ३१ | १०५० व्ही ए होम यु पी एस १२ व्होल्ट मायक्रोटेक / ल्युमिनस | ६,०००=०० प्रती १ नग | ५,८००=०० प्रती १ नग |
| ३२ | १७७५ व्ही ए होम यु पी एस २४ व्होल्ट मायक्रोटेक / ल्युमिनस | ९,५००=०० प्रती १ नग | ९,३००=०० प्रती १ नग |
| ३३ | १५० ॲम्पीअर टयुबलर बॅटरी लीड ॲसीड १२ व्होल्ट - ३६ महिने वॉरंटी असलेली एक्साईड | १६,०००=०० प्रती १ नग | १५,५००=०० प्रती १ नग |
| ३४ | २०० ॲम्पीअर टयुबलर बॅटरी लीड ॲसीड १२ व्होल्ट - ३६ महिने वॉरंटी असलेली एक्साईड | २३,२००=०० प्रती १ नग | २२,०००=०० प्रती १ नग |
| ३५ | रबर हॅण्डग्लोज ११००० व्होल्ट | ७७५=०० प्रती १ जोड | ६२५=०० प्रती १ जोड |
| ३६ | १०० ॲम्पीअर कॉपर फयुज वायर | १,७५०=०० प्रती १ किलो | १,१८०=०० प्रती १ किलो |
| ३७ | पी.व्ही.सी.टेप अँकर / स्टील ग्रीप | १३=५० प्रती १ नग | १२=०० प्रती १ नग |
| ३८ | ४०० वॅट मेटल हॅलाईट टयुब क्रॉम्प्टन | ८५०=०० प्रती १ नग | ७५०=०० प्रती १ नग |
| ३९ | ४०० वॅट मेटल हॅलाईट चोक क्रॉम्प्टन | २,६००=०० प्रती १ नग | २,४००=०० प्रती १ नग |
| ४० | २०० ॲम्पीअर कॉपर फयुज वायर | १,७५०=०० प्रती १ किलो | १,१८०=०० प्रती १ किलो |
| ४१ | ॲल्युमिनिअम लग्ज (राउंड टाईप) ५० एमएम | १०=०० प्रती १ नग | ९=०० प्रती १ नग |
| ४१ अ | ॲल्युमिनिअम लग्ज (राउंड टाईप)७० एमएम | १६=०० प्रती १ नग | १५=०० प्रती १ नग |
| ४१ ब | ॲल्युमिनिअम लग्ज (राउंड टाईप)१२० एमएम | २४=०० प्रती १ नग | २२=०० प्रती १ नग |
| ४२ | ॲल्युमिनिअम लग्ज (पीन टाईप) ५० एमएम | १८=०० प्रती १ नग | १६=०० प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२ अ | ॲल्युमिनिअम लग्ज (पीन टाईप) ७० एमएम | ४३=००<br>प्रती १ नग | ४०=००<br>प्रती १ नग |
| ४३ | फयुजकरीता १.१/२" नटबोल्ट स्प्रिंग व प्लेन वायसरसह | १८०=००<br>प्रती १ किलो | १५०=००<br>प्रती १ किलो |
| ४४ | सिगंल फेज डी ओ एल स्टार्टर ५ to १० A | २,२७०=००<br>प्रती १ नग | ८८०=००<br>प्रती १ नग |
| ४५ | थ्री फेज डी ओ एल स्टार्टर ९/१७ AMP | २,४००=००<br>प्रती १ नग | १,८६७=००<br>प्रती १ नग |
| ४६ | ३६ वॅट पी एल टयुब होल्डर | १८=००<br>प्रती १ नग | १६=००<br>प्रती १ नग |
| ४७ | २४ वॅट T-५ टयुब होल्डर | १८=००<br>प्रती १ नग | १६=००<br>प्रती १ नग |
| ४८ | टपारीया टेस्टर ८१३ | ७७=००<br>प्रती १ नग | ७०=००<br>प्रती १ नग |
| ४९ | टपारीया पक्कड इले. १६२७/८ | ३१५=००<br>प्रती १ नग | ३०२=००<br>प्रती १ नग |
| ५० | टपारीया स्क्रू ड्रायव्हर स्लीवसह ८२५ | ८०=००<br>प्रती १ नग | ७५=००<br>प्रती १ नग |
| ५१ | टपारीया स्क्रू ड्रायव्हर स्लीवसह ८२४ | ७८=००<br>प्रती १ नग | ७२=००<br>प्रती १ नग |
| ५२ | टपारीया स्क्रू ड्रायव्हर स्लीवसह ८२९१ | १६५=००<br>प्रती १ नग | १५५=००<br>प्रती १ नग |
| ५३ | टपारीया क्रॉसपीन हॅमर १/२ kg | ४१२=००<br>प्रती १ नग | ३९०=००<br>प्रती १ नग |
| ५४ | टपारीया स्पॅनर सेट | १,६००=००<br>प्रती १ सेट | १,५००=००<br>प्रती १ सेट |
| ५५ | ड्रिल मशीन ब्लॅक ॲण्ड डेकर मेक १२ एमएम | ३,९००=००<br>प्रती १ नग | ३,६००=००<br>प्रती १ नग |
| ५६ | टॉग टेस्टर ६५० AMP | ६,०००=००<br>प्रती १ नग | ५,५००=००<br>प्रती १ नग |
| ५७ | एल ए डी बॅटरी हॅण्ड टॉर्च | ९००=००<br>प्रती १ नग | ७१०=००<br>प्रती १ नग |
| ५८ | कॉर्डलेस बेल | ४५०=००<br>प्रती १ नग | ४०५=००<br>प्रती १ नग |
| ५९ | रेगुलर बेल (डींग डॅग)<br>अँकर | १६५=००<br>प्रती १ नग | १२३=००<br>प्रती १ नग |
| ६० | PVC बॉक्स १० x १२ गॅंगबॉक्स | २४०=००<br>प्रती १ नग | २२०=००<br>प्रती १ नग |
| ६१ | फॅन रेग्युलेटर ओल्ड टाईप मॉडयुलर टाईप बॉक्स टाईप | १२०=००<br>प्रती १ नग | ११०=००<br>प्रती १ नग |
| ६१ अ | फॅन रेग्युलेटर मॉडयुलर टाईप स्वीच टाईप | २६०=००<br>प्रती १ नग | २००=००<br>प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | पेनसील सेल AA | १८=००<br>प्रती १ नग | १५=००<br>प्रती १ नग |
| ६२ अ | पेनसील सेल AAA | ५५=००<br>प्रती १ नग | ५०=००<br>प्रती १ नग |
| ६३ | १६ AMP १ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ३३०=००<br>प्रती १ नग | २८०=००<br>प्रती १ नग |
| ६४ | ३२ AMP १ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ३४०=००<br>प्रती १ नग | २८०=००<br>प्रती १ नग |
| ६५ | २० AMP १ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ३२०=००<br>प्रती १ नग | २८०=००<br>प्रती १ नग |
| ६६ | १६ Amp २ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ८५०=००<br>प्रती १ नग | ७९०=००<br>प्रती १ नग |
| ६७ | ३२ Amp २ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ८५०=००<br>प्रती १ नग | ७९०=००<br>प्रती १ नग |
| ६८ | २० Amp २ पोल MCB बॉक्स सहित<br>पी.व्ही.सी.बॉक्स - इंडो कॉप | ८५०=००<br>प्रती १ नग | ७९०=००<br>प्रती १ नग |
| ६९ | १६ Amp ४ पोल MCB बॉक्स सहित<br>इंडो कॉप | १,७००=००<br>प्रती १ नग | १,३५०=००<br>प्रती १ नग |
| ७० | ३२ Amp ४ पोल MCB बॉक्स सहित<br>इंडो कॉप | १,७००=००<br>प्रती १ नग | १,३५०=००<br>प्रती १ नग |
| ७१ | २० Amp ४ पोल MCB बॉक्स सहित<br>इंडो कॉप | १,७००=००<br>प्रती १ नग | १,३५०=००<br>प्रती १ नग |
| ७२ | ६ Amp स्विच रेग्युलर<br>अँकर पेंन्टा | १७५=००<br>प्रती १ नग | २५=००<br>प्रती १ नग |
| ७२ अ | ६ Amp स्विच मॉडयुलर<br>अँकर पेंन्टा | २३०=००<br>प्रती १ नग | ४०=००<br>प्रती १ नग |
| ७३ | १६ Amp स्विच रेग्युलर<br>अँकर पेंन्टा | १७५=००<br>प्रती १ नग | ८६=००<br>प्रती १ नग |
| ७३ अ | १६ Amp स्विच मॉडयुलर<br>अँकर पेंन्टा | २३०=००<br>प्रती १ नग | ८६=००<br>प्रती १ नग |
| ७४ | ६३ AMP ४ पोल MCB बॉक्स सहित<br>इंडो कॉप | २,५००=००<br>प्रती १ नग | २,३००=००<br>प्रती १ नग |
| ७५ | १६ ॲम्पीअर सॉकेट मॉडयुलर<br>ग्रेट व्हाईट | १८०=००<br>प्रती १ नग | १६०=००<br>प्रती १ नग |
| ७६ | १६ ॲम्पीअर सॉकेट रेगुलर<br>Screw Type ग्रेट व्हाईट | ८४=००<br>प्रती १ नग | ७५=००<br>प्रती १ नग |
| ७७ | ६ ॲम्पीअर सॉकेट मॉडयुलर<br>ग्रेट व्हाईट | ८०=००<br>प्रती १ नग | ७०=००<br>प्रती १ नग |
| ७८ | ४५ वॅट स्ट्रीट लाईट LED फिटींग<br>BIS Approved<br>१ वर्ष वॉरंटी क्रॉम्प्टन | ३,५५०=००<br>प्रती १ नग | २,६००=००<br>प्रती १ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ७९ | २० वॅट स्ट्रीट लाईट LED फिटींग, BIS Approved १ वर्ष वॉरंटी क्रॉम्प्टन | १,४५०=०० प्रती १ नग | १,१५०=०० प्रती १ नग |
| ८० | २० वॅट LED टयुब ४Ft (कंप्लीट फिटींग) १ वर्ष वॉरंटी - क्रॉम्प्टन | २६०=०० प्रती १ नग | २५०=०० प्रती १ नग |
| ८१ | LED बल्ब ५ वॅट क्रॉम्प्टन | ९०=०० प्रती १ नग | ८५=०० प्रती १ नग |
| ८२ | LED बल्ब ९ वॅट क्रॉम्प्टन | ९५=०० प्रती १ नग | ९०=०० प्रती १ नग |
| ८३ | LED बल्ब १४ वॅट क्रॉम्प्टन | २१५=०० प्रती १ नग | २०५=०० प्रती १ नग |
| ८४ | LED बल्ब १८ वॅट क्रॉम्प्टन | ३१०=०० प्रती १ नग | ३००=०० प्रती १ नग |
| ८५ | १.० sq.mm कॉपर वायर आय.एस.आय.मार्क १ बंडल x ९० मीटर | १,४५०=०० प्रती १ बंडल | १,२९०=०० प्रती १ बंडल |
| ८६ | २.५ sq.mm कॉपर वायर आय.एस.आय.मार्क , १ बंडल x ९० मीटर | २,९००=०० प्रती १ बंडल | २,६००=०० प्रती १ बंडल |
| ८७ | १०० AMP कटआउट फयुज किटकॅट MEM Type | ७५०=०० प्रती १ नग | ६५०=०० प्रती १ नग |
| ८८ | २०० AMP कटआउट फयुज किटकॅट MEM Type | १,२५०=०० प्रती १ नग | १,१२५=०० प्रती १ नग |
| ८९ | १६ AMP ३ पीन टॉप | ७६=०० प्रती १ नग | ४३=०० प्रती १ नग |
| ९० | ६ AMP ३ पीन टॉप | ५६=०० प्रती १ नग | ३१=०० प्रती १ नग |
| ९१ | ९ Watt dual cell (कॉर्डलेस माईकसाठी) | ३८०=०० प्रती १ नग | ३४०=०० प्रती १ नग |
| ९२ | हॅण्डग्लोव्ह २४० व्होल्ट (LT लाईनकरीता) | ८५०=०० प्रती १ नग | ७६०=०० प्रती १ नग |
| ९३ | मेटल बॉक्स (सर्कीट) १२ वे SPN Double Door - सिग्मा | ७५०=०० प्रती १ नग | ६८०=०० प्रती १ नग |
| ९३ अ | मेटल बॉक्स (सर्कीट) १६ वे SPN Double Door - सिग्मा | ८८२=०० प्रती १ नग | ७९०=०० प्रती १ नग |
| ९४ | अँगल होल्डर - ग्रेट व्हाईट | ३३=०० प्रती १ नग | ३०=०० प्रती १ नग |
| ९५ | डबल पोल स्वीच DP ३२ AMP | २९५=०० प्रती १ नग | २७०=०० प्रती १ नग |
| ९६ | स्क्रू ७५ x ८ बॉक्स | २१५=०० प्रती १ बॉक्स | १९५=०० प्रती १ बॉक्स |
| ९७ | स्क्रू २५ x ८ बॉक्स | १३५=०० प्रती १ बॉक्स | १२५=०० प्रती १ बॉक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| ९८ | स्क्रू ३० x ८ बॉक्स | ६९=००<br>प्रती १ बॉक्स | ६५=००<br>प्रती १ बॉक्स |
| १०० | रॉवल प्लग २५ x ८ PVC | १५=००<br>प्रती १ पॅकेट | १२=००<br>प्रती १ पॅकेट |
| १०१ | १५० वॅट सोडीअम व्हेपर कंप्लीट फिटींग बल्बसह<br>Any Good Make | ३,४००=००<br>प्रती १ नग | ३,१५०=००<br>प्रती १ नग |
| १०२ | सी एफ एल बल्ब ११ वॅट<br>क्रॉम्प्टन | १२२=००<br>प्रती १ नग | ११०=००<br>प्रती १ नग |
| १०३ | सी एफ एल बल्ब २० वॅट<br>क्रॉम्प्टन | १७८=००<br>प्रती १ नग | १७०=००<br>प्रती १ नग |
| १०४ | ॲलन की सेट<br>Black Finish<br>४ mm<br>१२ mm<br>१७ mm<br>२२ mm | <br>२४=००<br>२२०=००<br>५००=००<br>१,३००=००<br>प्रती १ सेट | <br>२२=००<br>२०५=००<br>४७५=००<br>१,२१०=००<br>प्रती १ सेट |
| १०५ | १० sq mm ॲल्युमिनियम सर्विस वायर<br>आय.एस.आय.मार्क | ३७=५०<br>प्रती १ मिटर | ३५=००<br>प्रती १ मिटर |
| १०६ | ९० वॅट स्ट्रीट लाईट LED फिटींग<br>BIS Approved वर्ष वॉरंटी क्रॉम्प्टन | ४,४००=००<br>प्रती १ नग | ४,१००=००<br>प्रती १ नग |
| १०७ | ६० वॅट साधे बल्ब<br>क्रॉम्प्टन | १६=००<br>प्रती १ नग | १५=००<br>प्रती १ नग |
| १०७ अ | १०० वॅट साधे बल्ब<br>क्रॉम्प्टन | १७=००<br>प्रती १ नग | १५=००<br>प्रती १ नग |
| १०८ | २.५ sq mm कॉपर फलेक्जीबल वायर<br>आय.एस.आय.मार्क | ३६=००<br>प्रती १ नग | ३०=००<br>प्रती १ नग |
| १०९ | पेंडेट व्होल्डर | ३३=००<br>प्रती १ नग | २०=००<br>प्रती १ नग |

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे अ.क्र.१ ते ९३ अ,९४ ते ९८ व १०० ते १०९ चे विद्युत साहित्याचे उपरोक्त तक्त्यातील कॉलम क्र.४ मध्ये नमुद दरास मंजुरी मिळणेबाबात व अ.नं.९३ ब व ९९ चे दर प्राप्त न झालेल्या साहित्याची खरेदी मा.महाराष्ट्र शासन निर्णय उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग II/उदयोग-४ दिनांक.०१/१२/२०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिकेतील निर्देशानुसार विहित कार्यपध्दीतीचा अवलंब करुन करणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेस मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर./ अ

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. विदयुत अभियंता यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. विदयुत अभियंता यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. विदयुत विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. लेखापरिक्षक यांचा रजेवर

यावर मा. मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाहीस सादर

यावर मा. सहाय्यक आयुक्त (कर ) यांचा अभिप्राय की , प्रस्तावीत प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या विषयी माहिती सांगा.

विदयुत विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे :- अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभागा करिता सन.२०२१-२०२२ या आर्थिक वर्षा करिता शहरातील व उपनगरातील दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी आवश्यक असणा-या विद्युत साहित्याचे वार्षिक निविदा दर मंजुरी करिता मा.स्थायी समितीकडे मान्येतेसाठी पाठविला आहे.

मा.सभापती साहेब :- संपुर्ण शहराच्या विदयुतकरणाकरिता निविदाबाबत कधी पुर्ण होणार.

विदयुत विभाग प्रमुख श्री. मेहेत्रे :- सदरचा प्रस्ताव औरंगाबाद गव्हमेंट पॉलीटेक्नीक कडे थर्ड पार्टी इन्सपेक्शनकरिता पाठविला आहे तो प्राप्त झाल्यानंतर मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- संपुर्ण शहराच्या विदयुतकरणाकरिता निविदाबाबत प्रक्रिया पुर्ण झाली आहे. परंतु ती कार्यान्वीत होईपर्यत प्रभागातील विदयुत व्यवस्था होणे गरजेचे आहे. याकरिता विदयुत साहित्याच्या दरास मान्यता देण्यात येत आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक निविदा दर प्राप्त निविदांपैकी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर असणारे निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांच्या दरास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे विदयुत साहित्याचे वार्षिक निविदा दर प्राप्त निविदांपैकी स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर असणारे निविदाकार अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांनी वाटाघाटीनंतर कमी करून दिलेल्या अंतिम दरास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. शाम नळकांडे सही /-

अनुमोदक :- मा. श्री. सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका